म. ग्रं. सं. ठाणे
विषय कादंबरी
सं. क्र. ६५१०

REFBK-0003981

ग्रं. सं. टाण
किरण ८ वे.
... प्राची.

आवृत्ति दुसरी.

लेखक

दु० आ० तिवारी.

हें पुस्तक मुंबईविद्याखातें व नागपूरविद्याखातें यांनीं बक्षिसें व लायब्रऱ्यांकरितां मंजूर केलें असून यास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ-इंदूर या संस्थेनें बक्षिस दिलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
६२
ता. ८-८-३९

|| ॐनमश्चंडिकायै ||

काव्यकिरण-माला.

किरण ८ वा.

# अभंगमाला.

लेखक

**दु० आ० तिवारी, जळगांव.**

संपादक व प्रकाशक

**मि० का० भोरटके, जळगांव.**

मुद्रक

**एन्. एम्. नेमाडे**

श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस, जळगांव.

जुलै १९२

किंमत ०७

REFBK-0003981
ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३९८९

ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकाचें निवेदन.

" अभगमाला " हा काव्याकिरण मालेचा ८ वा किरण होय.

कवि तिवारी याच्या १३० अभगाची माला १९२५ सालीं प्रसिद्ध झाली. यातील प्रत्येक अभग अत्यत चित्ताकर्षक, वेधक व रसाळ असल्यामुळे अभगमाला साहजिकच लोकप्रिय झाली व तिची पहिली आवृत्ति सपली. मध्यतरीं कवि तिवारी यानीं पुन्हा १२० अभग लिहिले. तत्वज्ञान मदिर, लोकशिक्षण, सहविचार वगैरे महाराष्ट्रांतील सन्मान्य मासिकातून हे नवीन अभग प्रसिद्ध झाले आणि तेही रसिकादरास पात्र झाले.

महाराष्ट्रातील मराठी वीराचीं रणांगणावरील भव्य चित्रें रेखून अतःकरणात कल्लोळ उडवून सोडणारी कवि तिवारींची लेखणी भक्तिरसही कसा लिहू शकते याचें अभगमाला हे उत्कृष्ट उदाहरण होय. हें केवळ आमचेंच मत नसून महाराष्ट्रातील मासिकाच्या विद्वान सपादकानींही आपलीं हींच मतें प्रगट केलीं आहेत. तीं या पुस्तकास जोडिलीं आहेत; वाचकानीं वाचून पहावीं.

कवि तिवारी यानीं नवीन लिहिलेला केवळ १२० अभगाचा भाग काव्याकिरण मालेच्या वाचकांस द्यावयाचा विचार होता. परतु त्यामुळें आमचा वाचकवर्ग पूर्वीच्या १३० अभगास आचवला असता ह्मणून दोन्ही भाग एकत्र करून निघालेली अभगमालेची दुसरी आवृत्ति आह्मी त्याच्या हातीं देत आहों.

कवि तिवारींचीं सुदर सुदर पुष्पें आमच्या मालेस लाभत असल्यामुळें त्याचे पुनः पुन्हां आभार मानण्यांत आह्मास मनापासून आनदच होतो.

श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मालक श्रीयुत ना. मा. नेमाडे यानीं अल्पकाळात व अल्पमूल्यांत या पुस्तकाची छपाई आमच्या मनाप्रमाणें केली याविषयीं आह्मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानितों.

जळगाव
ता. १६-६-२९

मि. का. भोरटके.

# प्रस्तावना.

संस्कृत भाषेतील छंद शास्त्रात ज्यांचें नियमन केलें गेलें आहे व ज्यांचा संस्कृत कवींनीं आपल्या काव्यांत उपयोग केला आहे, तीं संस्कृत वृत्तें होत. आणि मुकुंदराय, ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव वगैरे साधु कवींनी ज्यांतून आपली काव्यें लिहिलीं तीं ओवीअभंगादि मराठी वृत्तें होत. हीं गणवृत्तें नसून मात्रावृत्तें आहेत. ज्याकालीं मराठींत काव्यांचा जन्म झाला त्या कालच्या मराठी भाषेच्या तोकड्या स्वरूपात संत व भक्त कवींचे पारमार्थिक विचार व्यक्त व्हावयास गणवृत्तें उपयुक्त झालीं नसावीं. शिवाय संस्कृतातील काहीं ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करितांना त्या भाषेंतील सामासिक शब्दांत बऱ्हंशानें भरून राहिलेला अर्थ मराठींत पूर्णत्वानें आणावयास ओवी, अभंग हीं सोपीं वृत्तेंच उपयुक्त वाटलीं असावीं असें तर्कशुद्ध अनुमान निघतें.

भारत, भागवत, रामायणासारखे संस्कृतातील प्रारंभींचे श्रेष्ठ काव्य-ग्रंथ अनुष्टुभासारख्या सोप्या वृत्तांत लिहिले आहेत. संस्कृतापासून निर्माण झालेल्या देशी भाषांतील साहित्यसंग्रहही अशाच सोप्याशा मात्रा वृत्तांत लिहिलेला आढळतो. दक्षिणेंतील मराठी सोडून उत्तर भारतांतील हिंदी भाषेकडे पहावें तों तींतीलही उत्कृष्ट काव्यें, दोहा, चौपाई, सवाई, घनाक्षरी, छप्पय वगैरे मात्रावृत्तांतूनच लिहिलेलीं आढळून येतात. तुलसीदासाचें रामायण, बिहारीची सतसई, गिरि-धराची कुंडलिया, नरसी मेहेताची प्रभाती, सुरदास, मीराबाई, व कबीर यांची चित्ताकर्षक भजनावली हीं सर्व अशा मात्रावृत्तांतून गुंफली गेली आहेत. गुजराथी, पंजाबी, बंगाली, वगैरे इतर देशी भाषां-तूनही हाच प्रकार पहावयास मिळतो. यावरून स्पष्ट दिसते कीं, भाषेच्या पूर्व स्वरूपांत कवींच्या भावना पूर्णतेनें व्यक्त व्हावयास गणवृत्ता-

पेक्षा मात्रावृत्तेंच अधिक उपयोगी पडतात. परंतु भाषेंत जों जों शब्दाचा अधिक भरणा होऊन तिला प्रागल्भ्य येतें तों तों कवींच्या व्यंजनाश-क्तीस अवसर मिळून काव्याच्या सौंदर्यातिशयाकरिता गणवृत्ताचा आदर होऊं लागतो. संस्कृतातील अनुष्टुप छंदानंतरचीं गणवृत्तात्मक महा-काव्यें व मराठींतील ओवी अभंगानंतरची वामनपंडित, रघुनाथपंडित यांची वृत्तात्मक कविता या विधानाला पुष्टि देते. येथें हीही महत्वाची गोष्ट सूचित करावीशी वाटते की, मात्रावृत्तांत देशी भाषेंतील पूर्व कवींच्या भावनेस जो अवसर मिळाला त्यानेंच कवितेच्या अंगावर यमकप्रासाचे अलंकार चढविले. प्रत्येक देशी भाषा बोलणाऱ्या रसिकानें आपल्या मातृभाषेचे हे अलंकार लहानपणापासून पाहिलेले असल्यामुळे तिला त्या अलंकाराव्यतिरिक्त पहाणें त्यास स्वभावतःच रुचत नाहीं.

मराठींतील पूर्व कवींची ओवी व अभंग ही दोन वृत्तें घेतलीं तर या वृत्तांत त्या कवींचें किती तरी काव्यवाङ्मय निर्माण झालें आहे! मात्र ग्रंथरचनेच्या कामीं संस्कृतांत जसें अनुष्टुप, हिंदींत जसा दोहा तशी मराठींत ओवीच उपयोगांत आणलेली आहे. ज्ञानेश्वरी, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, रुक्मिणी स्वयंवर वगैरे बहुतेक मराठी धार्मिक ग्रंथ ओवी वृत्तांतच लिहिले आहेत. अभंग हें वृत्त ग्रंथरचनेच्या उपयोगीं आणिलेलें कोठें दिसत नाहीं. संसाराविषयी अगदीं उदासीन अशा तुकाराम, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई वगैरे भगवद्भक्तांनीं आपले पारमार्थिक विचार ईश्वरभक्ति, तद्रूपभावना या अभंगांतूनच व्यक्त केल्या आहेत. अर्थात् या भागवत कवींच्या भक्तिकुंजांत वेळोवेळीं उमललेली ही अभंगाची फुलें अजूनही अभंग परिमल देत आहेत! त्यांतही तुकारामाच्या अभंगकुंजांतील परिमल अत्यंत उत्कट म्हणून प्रसिद्ध आहे.

ओवी अभगाची परपरा रामदासापर्यंत विशेष आढळते. परंतु पुढे वर उल्लेखिलेल्या नियमाप्रमाणें मराठीला प्रौढ स्वरूप येताच वामन रघुनाथ पडिताच्या गणवृत्तात्मक कवितेचा प्रदेश आढळतो. आधुनिक कवींत कै० रे० टिळक आणि कै० गोविंदाग्रज यानीं काहीं अभग लिहिले. त्यात त्या दोघानींही आपला ईश्वरीभावच व्यक्त केला आहे. यावरून अभग हे भक्तिमय स्फुट काव्यरत्नाचें कोंदणच आहे असें ह्मणावे लागतें. कारण आधुनिक काळातील सतपरपरेपर्यंत केवळ स्थूल मानानें पाहिलें तरी असें दिसून येईल की, ज्यास थोडें तरी काव्याचें अंग आहे अशा बहुतेक सतांच्या अतःकरणात फुललेलीं काव्याचीं सुमनें अभगवृत्तसूत्रातूनच गुफलीं गेलीं आहेत.

सहजोद्गार हें अभगाचें मुख्य लक्षण आहे. या पुस्तकांतील अभगाचा आरभ सहजोद्गारानींच झाला. काव्यरत्नावलीचे सपादक श्री. रा. रा. ना. न. फडणीस यास ते प्रारभींचे अभग फार आवडले. तत्वज्ञान मदिर, धर्म जागृति, आत्मबोध, लोकशिक्षण, सद्विचार वगैरे मासिकांतून हे अभग जसजसे प्रसिद्ध झाले व अजून होत आहेत तसतसी काव्यरसिकाची त्याजविषयींची प्रसन्नता दिसून येत आहे. आज रसिकापुढें ही अभंगमाला पुस्तकाची दुसरी आवृत्ति येत आहे. १३० अभगांची पहिली आवृत्ति सन १९२५ सालीं प्रसिद्ध झाली. ती बरीच लोकप्रिय होऊन तिच्या सर्व प्रति सपल्या, आणि दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आला. पहिल्या आवृत्तीवर महाराष्ट्रांतील मासिकांच्या व वृत्तपत्राच्या रसिक आणि विद्वान सपादकानीं दिलेले प्रसन्न अभिप्राय या दुसऱ्या आवृत्तीस जोडले आहेत. त्याजवरून त्याची या पुस्तकाविषयींची उत्कट सदभिरुचि दिसून येईल. या विद्वानाच्या सदभिरुचिला मी नम्रतेनें नमस्कार करितो.

मुंबई--विद्याखातें व नागपूर--विद्याखातें यांनीं हें पुस्तक बक्षिसें व लायब्ऱ्याकरितां मंजूर केलें आणि महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ-इंदूर या संस्थेनें या पुस्तकास बक्षिस दिलें ह्मणून त्या त्या गुणज्ञ संस्थांचे आभार मानणें उचित होय.

पहिल्या आवृत्तीनंतर पुन्हा १२० अभंग लिहिले. ते या दुसऱ्या आवृत्तींत समाविष्ट केले आहेत. यातील अभंगाचे सामान्यतः तीन भाग पडतात. पहिला भाग परमेश्वर विषयक प्रसन्न भक्तीचा. दुसरा व्यवहार विषयक व तिसरा अगदीं निराळा. नवीन १२० अभंगाचें स्वतंत्र पुस्तक काढणें किंवा पहिल्या आवृत्तीच्या शेवटीं त्या अभंगाचा स्वतंत्र भाग जोडणें यापेक्षां त्या अभंगाचें वर्गीकरण करून तें वरील तिन्ही भागांत विभागून अभंगमाला हें एकच पुस्तक ठेवणें बरें वाटलें. मला विश्वास वाटतो कीं, महाराष्ट्रीय सद्रसिकास ही अभंगमाला पूर्वीइतकीच मनोहर वाटेल; व ते पूर्वीप्रमाणेंच हिचा आदर करतील.

अभंगाचे जे प्रकार आहेत त्यापैकीं,

|| आपुलिया बळें नाहीं बोलवत । सखा भगवंत, कृपा त्याची ||

हा एकच प्रकार मी उपयोगांत आणिला आहे. अशा अभंगाच्या एका ओळींत चार चरणें कल्पिलीं तर मधल्या दोन चरणांत यमक असतें. परंतु एका अभंगाच्या चारी ओळींच्या शेवटीं यमक क्वचितच असतें. या अभंगमालेंत थोडेसे अपवाद सोडून मधलीं व शेवटलींही यमकें साधलीं आहेत.

ज्या संत कवींकडून आजवर अभंग लिहिले गेले त्यांच्या साध्या, सरळ व व्यावहारिक भाषेचेंच वळण अभंगास लागलें आहे. त्यांत संस्कृत शब्दांचा भरणा, त्यांचे समास, वगैरे कांहीं नसून उलट जुने

मराठी शब्द, लहान लहान वाक्यें. असेंच अभंगाचें भाषास्वरूप सर्वांच्या परिचयाचें आहे. पूर्वींची मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा यांचीं स्वरूपें बदललीं असल्यामुळें मी साध्या सरळ भाषेतच हे अभंग लिहिले असले तरी आजच्या मराठीचें स्वरूप त्यांत व्यक्त होणें साहजिक आहे.

तुकारामासारख्या भगवद्भक्ताच्या अभंगाची श्रवणमनोहर वीणा-कुठें आणि अभंगमालेच्या लेखकाची ही लहानशी बासरी कुठें ! या बासरींतिल कांहीं सूर काव्यरसज्ञास आवडले तर त्याचेंही श्रेय त्या बनसीधर गोपाळकृष्णाकडेच आहे.

॥ मी तों आहें तुझ्या मुखाची बासरी । कंठाची माधुरी नाहीं माझी ॥

अभंग १८

जळगांव ता. १५।६।२९

दु० आ० तिवारी

## अभंगमालेच्या पहिल्या आवृत्तीवरील कांहीं विद्वान् व रसिक संपादकांचे अभिप्राय.

ग्रं. क्र. 3289

### वृत्तपत्रें

लोकमान्य–मुंबई ( ता. ५।१२।२५ )

कवि श्री. तिवारी महाराष्ट्रीयांच्या दीर्घ परिचयाचे आहेत. त्यांच्या काव्यांत भावनेचे चटके, प्रतिभेचें मनोहारित्व व ओजसाची प्रखरता हीं परोपरीनें अनुभवास येतात. प्रस्तुत पुस्तकामुळें भक्ति हा त्यांचा उच्च गुण प्रतीत होत आहे. आधुनिक काव्यांपैकीं हें एक दुर्मिळ असें काव्य आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं प्रस्तुत काव्यांत भक्ति आणि करुण रसाचा इतका अकृत्रिम मिलाफ झाला आहे कीं कित्येकदां त्यांची निवडही करितां येत नाहीं.

ज्याच्या करीं होती सुंदर बासरी । मोरपिसें शिरीं पाहिला, का?
देहीं घनश्याम नयनाभिराम । गोपाल-ललाम पाहिला का?

लक्ष्मण बंधु पडे भूमिवरी । तुवा अंकावरी निजविला
रघुकुलनाथा! त्याच अंकावरी । घेशी केव्हा तरी सांग मला?

उत्कंठा–योगात प्रीतीच्या साह्यानें । भक्त ये भक्तीनें दारापाशीं
निष्कांचन योगें बडव्यानीं कांहीं । येऊं दिलें नाहीं पायापाशीं

असे किती तरी उतारे देण्यासारखे आहेत. पण यापेक्षा रसिकांनीं हें काव्य अवश्य वाचून पहावें अशीच शिफारस करणें उचित होय. भाषेच्या व कल्पनेच्या उत्क्रांतीमुळें होणारा फरक सोडिला तर तुकाराम महाराजांच्या काव्यातील प्रसाद यातही आस्वादावयास मिळतो.

'सुंदर कितितरि खचित अहा!'
हीं चेंडूचीं भिकार गाणीं शिकविण्या ऐवजीं शाळाखात्यानें वरच्या वर्गाकरितां अभंगमालेसारखीं पुस्तकें मान्य केलीं तर शिक्षणाचा हेतु यथार्थतेनें सिद्ध होईल. सदर अभंगमालेचें समर्पण योगेश्वर श्रीकृष्ण परमात्म्याच्या चरणावर करिताना कवींनीं गुंफलेल्या झेल्यांत त्याच्या काव्यगुणाची परमावधिच झाली आहे. महाराष्ट्र-रसिकांनी असल्या पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा अशी आमची शिफारस आहे."

प्रबोध–धुळे ( ता. २०।१२।२५ )

"मराठ्यांचीं संग्रामगीतें, झांशीची संग्रामदेवता आदिकरून वीररसात्मक काव्यें लिहून महाराष्ट्राच्या परिचयाचे झालेले जळगांवचे श्री. तिवारी कवि यांनींच ही अभंगमाला गुंफिली आहे. या मालेंतील पुष्पांचा गंध खरोखरच अत्यंत मधुर असून तो आपल्या नैसर्गिकत्वानें वाचकाचें अंतःकरण भक्तिरसाकडे ओढून घेतल्याशिवाय रहात नाहीं. आधुनिक मराठी कवींमध्यें अभंगवृत्तामध्यें कविता रचणारे असे फारच थोडे कवि आहेत. रे० टिळकांची अभंगवृत्तात्मक कांहीं कविता असून ती पुष्कळ रसभरितही आहे. तथापि ती ख्रिस्तधर्मविषयक असल्यानें हिंदुधर्मीय वाचकांना बरेच वैरस्य उत्पन्न करिते. तिवारी हे आपल्या काव्यदेवतेची उपासना जसजसी अधिक निष्ठेनें व प्रयासानें करीत राहतील तसतसा तिचा कृपाप्रसाद त्याच्यावर अवश्य होत राहून ते एक तिच्या प्रियभक्तगणांतील होतील असा आम्हास दृढ भरंवसा वाटतो."

नवाकाळ–मुंबई [ १७।१।२५ ]

"जुन्या व नव्या वळणाच्या अनेक कविता रचून कवि या नात्यानें अर्वाचीन कविमंडळांत बरेच अग्रेसर असलेले

रा. दु० आ० तिवारी यांनीं निर्मिलेल्या १३० अभंगांची ही माला आहे.. अभगमालेचे तीन भाग आहेत. १ ईश्वरविषयक प्रसन्न भक्तीचा २ सामान्य व्यवहार विषयक व ३ रा भाग अगदीं निराळा आहे. आरंभीं भगवान महाविष्णूचें चित्र आहे. जगाच्या पसाऱ्यातील तत्वान्वेषणाच्या मार्मिक दृष्टीनें पहाणाराला बोधाची प्राप्ती होते- . .रा. तिवारी याच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागात असेच मार्मिक उद्गार आहेत. अर्वाचीन कवितेच्या भोक्त्यांसाठीं त्यांनीं हा तयार केलेला मेवा जुन्या अभंग-रसिकांचेंही रंजन करील. पुस्तकाची छपाई चांगली आहे. "

स्वधर्म-पुणें ( ता. १५।१०।२५ )

" श्री तिवारी यांची प्रतिभा सर्वविश्रुतच आहे. तथापि या अभंगांत प्रासादिकपणा व प्रेमळपणा हे गुण विशेष आल्हादकारक आहेत. अभगविषय, ईश्वरभक्ति व सामान्य व्यवहार असून मांडणी अगदीं सुलभ आहे. अभंग वाचतांना मन तल्लीन झाल्यावांचून रहात नाहीं. "

उदय-उमरावती ( ता. २३।१२।२६ )

" खान्देशातील जळगावचे सुप्रसिद्ध कवि श्री० दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी ह्यांचे भक्तिपर व गोड असे १३० अभग ह्या पुस्तकात दिले आहेत. त्यावरून सहज खात्री पटेल कीं, श्री० तिवारी हे वीररसाइतकाच भक्तिरसही चांगला लिहितात. व त्यास भक्तीचा खरा जिव्हाळा आहे. त्यातल्या त्यात सुमारें ८०, ९० पासूनचे अभग विशेषच सरस आहेत. "

किरात-रत्नागिरी [ ता. ९।११।२५ ]

" १३० मण्याची ही ' अभगमाला ' नावाप्रमाणेंच अन्वर्थक असून जाड व ग्लेज पेपर आणि उत्कृष्ट छपाई यानें अलंकृत आहे.

महाराष्ट्राचे परिचित प्रसिद्ध कवि श्री. तिवारी यांची ही कृति खरोखरच आदरणीय आहे. कवीनें आपल्या पवित्र हृदयमंदिराचे चारी दरवाजे खुले करून हृदयस्थ परमात्म्याची जिव्हाळ्याच्या भक्तिभावानें केलेली प्रार्थना अभाविकांच्याही अंत:करणास प्रेमार्द्र करणारी आहे."

प्रागतिक–जळगांव ( ता. २८।९।२५ )

" खान्देशांतील कवि श्री. दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यानीं लिहिलेले हे अभंग ' सहजोद्गार ' या विशेषणास खरोखर पात्र आहेत. अभंगमालेंत ईशभक्ति सामान्य व्यवहार वगैरे विषय सरळ व प्रासादिक भाषेंत लिहिले असल्यामुळें परिणामकारक झाले आहेत. खान्देशांत बालकवी ठोंबऱ्याप्रमाणें जास्तींत जास्त उत्कृष्ट कविता तिवारी लिहीत आहेत हे खान्देशास भूषण आहे. पुस्तकाची छपाई चांगली आहे. "

केसरी–पुणें ( ता. २४।११।२५ )

" अभंगांत प्रसाद गुण बरा साधला आहे. "

ज्ञानप्रकाश–पुणें [ ता. ३।१०।२५ ]

". . .यांतील बहुतेक अभंग श्रीकृष्ण भक्तिपर असून काही व्यावहारिक उपदेशाचे आहेत. अभंगांची भाषा सहज, जोरदार व भक्तिरसपूर्ण आहे. "

प्रजापक्ष–अकोला [ ४।१०।२५ ]

" भाषा शुद्ध व रसाळ आहे. भक्तिरसही चांगला भरलेला आहे. "

# मासिकें.

**लोकशिक्षण–पुणें.** (फेब्रुवारी १९२९)

"या लहानशा पुस्तकात १३० अभग ग्रथित केले आहेत. पहिले ईशस्तुत्यात्मक काहीं अभग सोडिले असता बाकीच्या अभगात नावीन्य, मनोरजकता व भावपूर्णता भरलेली आहे. व पहिल्याही अभगांत विषय जुनेच असले तरी सागण्याची हातोटी नवीन आहे, असे ह्मणावयास हरकत नाही. **अभंगाची धाटणी श्री. तिवारींना उत्तम साधलेली दिसते.** तीनही पुस्तकात (मान्यांची यमुना, शिवप्रताप, अभगवाला) हें **पुस्तक स्तुतीस अधिक पात्र आहे. हल्लींच्या काळीं मागें पडलेले अभंग अशा प्रयत्नांनीं पुढें आणण्याचें श्रेय तिवारींनीं घेतल्यास चांगलें होईल. अभंगामध्यें सहजता फार असते ही गोष्ट या पुस्तकाच्या वाचनानें कळून येईल.** तिवारींच्या अभगरचनेचें काहीं मासले खालीं दिलें आहेत.

तुझ्या उपकारी बद्ध मज करी । नको दारोदारी पाठवू बा !
तुझ्या स्नेहीं लाव माझ्या या मनाला । मनधरणीला त्रासलों बा !
तुझ्याची आधीन मज घे करून । किती पराधीन रहावें बा !
माझे डोळे आले अश्रुनीं भरून । पाठीशीं येऊन ठाक उभा !

बरवा तो चद्र दूर अबरात । ज्या योगें चकोर सतोषती
बरवा तो मेघ दूर गगनात । ज्या योगें चातक आनदती
बरवा तो सूर्य दूर आकाशात । ज्या योगें सरोज प्रफुल्लती
जोंवरी सद्गुणी अलिप्त राहती । तोंवरी महती पावताती

कुसुमाची शोभा दुरुनी पहावी । शरिरी नखही लावू नये
कोकिळाची वाणी दुरोनी ऐकावी । मध्यें कटु वाणी बोलू नये
मोराचा पिसारा दुरोनी पहावा । काहीं आविर्भावा दावू नये
नैसर्गिक गुणी गुणमग्न होता । आपण धृष्टता सेवू नये

समुद्राच्या पोटीं रत्नें निपजती । शखही जन्मती त्याच्या पोटीं
आकाशाच्या पोटीं सूर्य चंद्र पाही । धूमकेतू तेही त्याच्या पोटीं
मानसाच्या तीरीं हंस जन्म घेती । बेडूकही किती उपजती
एकस्थानीं जन्म एकस्थानी वास । ज्याचे गुण त्यास निवडिती

**विविध ज्ञान विस्तार**—मुंबई [ जुलै १९२६ ]

" अभंग मालेंतील सुमारें निम्मे अभंग भक्ति-परमार्थपर असून बाकीचे सामान्य व्यावहारिक, नीति विषयक आहेत. अभंगवृत्तांतील रचना साधी सुबोध, ठसठसीत व सारखी वाहती असावी लागते. आणि रा. **तिवारींच्या कृतींत हे सर्व गुण चांगलेच अनुभवास येतात.** ... प्रत्येक अभंगाचा स्वतंत्रपणें व काव्यदृष्टीनें विचार केला असता रा. **तिवारींची अभंगकृति हृदयंगम झाली आहे.** भक्तिपर अभंग रसाळपणानें अंतःकरणाला चटका लावितात. इतर अभंगांत त्यांनीं आपला **व्यावहारिक अनुभव, निसर्ग निरीक्षण, कल्पना कौशल्य, व वाणीचा आवेश, हीं ओतप्रोत ओतल्यामुळें यांची रचना भेदक व वेधक झाली आहे.** नमुन्या करितां येथें दोन अभंग उतरून घेतों.

समुद्राच्या पोटीं रत्नें निपजती । शखही जन्मती त्याच्या पोटीं
आकाशाच्या पोटीं चंद्रसूर्य पाही । धूमकेतू तेही त्याच्या पोटीं
मानसाच्या तीरीं हंस जन्म घेती । बेडूकही किती उपजती
एकस्थानीं जन्म एकस्थानीं वास । ज्याचे गुण त्यास निवडिती ॥

आपुलेंच नाहीं स्वच्छ घरदार । परक्याच्या केर कां काढावा ?
आपुलीच नाहीं प्रेममय वाचा । शिव्या परक्याच्या कां मोजाव्या ?
आपुल्याच नाहीं शोधिलें चित्तास । बोल परक्यास कां लावावा ?
अनदृष्टी आधीं तुझी तूंच कर । तुवा परभार कां वाहावा ?

बा. अ. भिडे.

सद्विचार-बडोदें [ आक्टोबर १९२५ ]

" उत्कट मनोभावनाचा उद्गार करण्याचें मराठी कवींचें साधन ह्मणजे अभंग होय. ज्ञानदेवापासून रे. टिळकापर्यंत मराठ्यांना जेव्हां जेव्हां भक्ति, क्रोध, वैराग्य याचे उमाळे येत तेव्हां तेव्हां त्यांनीं त्यांचा अभंगातच संग्रह केला. रा. तिवारी जातीनें 'परदेशी' तरी अंतःकरणाचे मराठे असल्यानें त्यांनी सुनीत-स्वनीत-चतुर्दशकादि बाटग्या सांप्रदायाचें अनुकरण न करिता सताचींच अभंग-वाट धरिली आहे. एकदर १३० अभंगापैकीं थोडेसे भक्तिपर आहेत. .. ... परंतु बाकीच्या शमर अभंगांत अन्योक्ति, दृष्टांत, तुल्ययोगिता वगैरे अलंकार मनोहर साधले असून प्रसाद गुणाची रेलचेल आहे. कित्येक तर तुकोबाच्या तोडीचेही आले आहेत. या पुस्तकातील दोषांचा उल्लेख करण्याचें धाडस आह्मी करीत नाही. कारण कवि स्वतःच रसाळ वाणीनें सांगतात:—

फणसाची गोडी सेविता सेविता । कंटकांची निंदा कशाला हो !
चंदनाचा गंध लाविता लाविता । सर्पसंग-वार्ता कशाला हो !
कोकिळाची वाणी ऐकता ऐकता । त्याची जन्मकथा कशाला हो !
गुणश्रेष्ठ जे जे गुणानंदीं त्याच्या । अवगुण-चर्चा कशाला हो !

अशा तऱ्हेचीं सुभाषितें जागोजाग पसरलीं असल्यामुळें सद्यःकालास हे अभंग विशेषच उपयुक्त आहेत.

महाराष्ट्र कृषिवल-पुणें [ आक्टोबर १९२५ ]

" श्री तिवारी हे नाणावलेल्या आधुनिक कवींपैकीं एक असून त्यांची ही अभंगमाला त्यांच्या इतर कविताप्रमाणेंच रसपूर्ण आहे. तिवारी ह्मणतात त्याचप्रमाणें-' अभंग हें भक्तिमय स्फुट काव्यरत्नाचें कोंदणच आहे ' हें खरें आहे. व हें

त्यांच्या पहिल्या ५६ अभंगावरून दिसून येईल. ' सहजोद्गार हें अभंगाचें मुख्य लक्षण आहे ' असें जें ते म्हणतात तेंही यथार्थ असून ह्याप्रकारची सहज स्फूर्ती त्यांचे अभंग वाचले असता दृग्गोचर झाल्याशिवाय रहात नाहीं. सत्तावनाव्या अभंगापासून पुढील अभंग स्फूर्तीदायक असून फारच मार्मिक असल्यामुळें ही अभंगमाला प्रत्येकानें संग्रहीं ठेवण्यासारखी झाली असून मुलांकडून अभंग पाठ करून घेण्यासारखे झाले आहेत. "

आनंद--पुणें ( आक्टोबर १९२५ )

" कवि श्री. दु. आ. तिवारी यांची वीररसप्रधान कविता जितकी अंत करणाची वृत्ति क्षुब्ध करून सोडणारी आहे, तितकीच त्यांची ही भक्तिपर स्फुट कविता मनाला शांतता प्राप्त करून देणारी आहे. अभंगासारखें साधें वृत्त, साधे दृष्टांत आणि साधी भाषा यांनीं कवितेला एक प्रकारचें मोहकत्व आणिलें आहे. "

मराठी शिक्षक--पुणें [ आक्टोबर १९२५ ]

" वाचकांस चिरपरिचित असलेले कवि दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांची काव्यरत्नावली प्रफुल्लता, मराठी शिक्षक इ० मासिकांतून प्रसिद्ध झालेली ही अभंगाला. स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें छापून प्रसिद्ध केलेली आहे. या मालेंत कांहीं भक्तिपर, कांहीं सामान्य व्यवहार विषयक व कांहीं दुर्जन निंदापर असे त्रिविध अभंग असून त्यांची भाषा व वर्णनशैली अभंगवाणीच्या परंपरेस साजेसी सरळ व सोपी आहे. "

**दूत सोलापूर** [ आगष्ट--सप्टेंबर १९२८ ]

" जळगावचे सुप्रसिद्ध कवि रा. **तिवारी यांचें हें सुंदर काव्य आहे. काव्यप्रेमी लोकांनीं जरूर संग्रह करावा** आणि नुसत्या रमणीवर काव्यें करीत न बसतां कवि तिवारी यांचें अनुकरण करून भक्तिपर अथवा स्फूर्तिपर काव्यें निर्माण करण्याकडे अधिक लक्ष दिल्यास रा. तिवारी याच्या या प्रयत्नाचें अधिक चीज होईल. "

**मधुकर कोरेगांव** [ श्रावण शके १८५० ]

" अभंगमाला पुस्तक भाविक कवितांचें आहे. **अभंगवृत्त, आणि रचना सोपी व प्रसाद पूर्ण, वाचतांना आपण जुन्या कवींचेंच काव्य वाचीत आहों, असें वाटतें.** यात योजिलेले अलकार उपमा, कल्पना नेहमींच्याच आहेत, पण रचनेंत कौशल्य आहे, यात शंका नाहीं.. "

**उद्यम–नागपूर** [ आक्टोबर १९२५ ]

" प्रसिद्ध कवि श्री. दु. आ. तिवारी याच्या स्फुट अभगाचा हा सग्रह आहे. **अभंग मोठे रसाळ व प्रेमळ आहेत कवीचा परमेश्वर विषयक गाढ अनुभव त्यांत जागोजाग प्रगट झालेला दिसतो.** व्यावहारिक अभगातून लौकिक व्यवहाराचाही श्री. तिवारी यानीं बराच प्रपच केला आहे. "

**भारतमित्र--रीवणगोवा** ( वर्ष ३ अ. ८ )

" भारतमित्राचे सुप्रसिद्ध कवि श्री. दु. आ. तिवारी यानीं आपल्या गोड भाषेत लिहिलेलें परमेश्वर विषयक, तात्विक आणि व्यावहारिक असे १३० सुरस **अभंग** या पुस्तकात दिले असून ते **सर्वांनाच आनंददायक वाटण्यासारखे आहेत.** पुस्तकाचा कागद, छपाई इत्यादि सुरेख साधल्यामुळें तें सर्वांग सुदर झाले आहे. "

[illegible]

# समर्पण.



तुझें एक ध्यान हरपलें भान । नादांत रंगून हार केला ॥
परिमलहीन सौंदर्यविहीन । माझी ही अर्पण पुष्पमाला ॥
तूंच शबरीच्या सेविलें बोराला । प्रेमाचा उमाळा ओळखिला ॥
नको दोष पाहूं दास मी पायाचा । असूं दे खुणेचा माझा झेला ॥ १ ॥

विनीत

द. आ. तिवारी.

# अभंगमाला

३०८९.

यमुनेच्या तीरीं कर्णमनोहारी | वाजवी बासरी गिरिधारी
गोप गोपिकांचा सभोंवतीं मेळा | तन्मय जहाला गानांतरीं
मिटल्या नेत्रानें दृश्य तें पहावें | रूप आठवावें मनोहारी
परी ताटातूट करीते ही माया | अडकलों राया! या संसारीं

२

तुझें नवनाम नव दिनीं घ्यावें | कर्तव्यीं रमावें उत्साहानें
तुझाची आधार तुझाची आश्रय | विपत्तीचें भय चित्त नेणें
कर्तव्यश्रमाचा उच्छ्वास शेवटीं | सोडूं जगजेठी त्वन्नामानें
शंखचक्रधारी वैकुंठविहारी | होई साह्यकारी वात्सल्यानें

३

तुझें नाव घ्यावें संसारीं रहावें | दु:ख हाल जावें विसरोनी
तुझें नांव घ्यावें कर्म आचरावें | फलाफल जावें विसरोनी
तुझें नांव घ्यावें भक्तिगीत गावें | तालसूर जावें विसरोनी
नामाच्या नौकेंत झोकोनिया देह | जावें नि:संदेह उद्धरोनी

४

किती खावीं द्राक्षें वाटतीं खावीशीं | माधुरी मुखाशीं सोडीचना
किती वेळा घ्यावा कुसुमाचा वास | मोह नासिकेस आवरेना
किती वेळा घ्यावा इक्षुदंड-रस | लोभ रसनेस आवरेना
तुझें नामामृत किती वेळा घ्यावें | पुन्हां मन धावे आवरेना

५

नाम घेतां मूर्ती भरते या नेत्रीं   पूजेची मी पूर्ती करूं कैशी?
गंध फूल पुष्पें आरती नैवेद्य   दिलें मनोवेध हीं सेवेसी
यावें भक्तिनाथा! माझ्या आवडीच्या   बैसा हृदयाच्या आसनाशीं
जातां जाता माझें बोट हातीं धरा   घेवोनीया चला या बाळासी

६

दयेचा सागर तुज म्हणूं जरी   सागराच्या तीरीं गाळ आहे!
सुखाचा तूं शैल ऐसें म्हणूं जरी   कठिण अंतरी शैल आहे!
कृपेचा तूं मेघ ऐसें म्हणूं जरी   चंचल लहरी तोही आहे!
वदती अनंता! तुज सर्वोत्तम   कीर्ती निरुपम तुझी आहे!

७

ज्याच्या करीं होती सुंदर बासरी   मोरपिसें शिरीं, पाहिला का?
देहीं घनश्याम नयनाभिराम   गोपाळललाम पाहिला का?
कुंजवनचारी यमुनाविहारी   कृष्ण मनोहारी पाहिला का?
ऐशी जी पृच्छिका धन्य ती राधिका   आमुचाच सुका भाव फिका

८

उद्धवा! जा सांग, भेटणार नाहीं   वळणार नाहीं पाय कधीं!
जरी भेट झाली, पाहणार नाहीं   बोलणार नाहीं अक्षरही!
गुळ खाणोनी का कान टोंचवूं बा!   करायाची शोभा काय तरी!
इतुक्यांत आला मुरलीचा नाद   सपला विवाद राधिकेचा!

९

सासू छळ करी, संत सखूबाई   तुझी भक्ति काहीं सोडीचना
बांधिलें स्तंभाशीं दृष्टि गगनाशीं   तुझ्या चरणाशीं विसरेना
भक्ताच्या संकटीं धांवी नारायणा   कोणाला करुणा तुजवीना
सतसखूरूपें प्रगटे जी मूर्ती   [illegible]

१०

सखूचा संसार सखूरूपें केला तिज पंढरीला पाठवीली
देउळांत गेली चरणीं लागली मुक्तीस पावली त्याच स्थळीं
पडलें साकडें रुक्मिणी देवीला चिंतुनी तिला उठवीलें।
सखूसाठीं अतीं निचीया गेहाला प्रकटून लीला दावियेली

११

जल भरण्याला नदीवर आली सधी ती मिळाली दर्शनाची
भजनाचा मेळा जाय दाराहून मिळाला तो क्षण भजनाचा
छळकरु सासू ती स्तंभालागीं बांधी लागली समाधी स्मरणाची
ऐशा सखूसाठीं धावली धावली मूर्ती ती सावळी वैकुंठाची

१२

धनुर्धारी भीष्म वर्षताहे बाण विद्धांग अर्जुन जैं जाहला
भक्त-कारुण्यानें प्रतिज्ञा मोडून द्वारकेचा नाथ खड्ग त्याला!
रथाखालीं आला तोंच चरणाला पाही अर्जुनाला लोळलेला!
वैकुंठाचा नाथ अडविला भक्तें दृश्य रमवीतें मानसाला!

१३

सायंकाळ झाला तरी अर्जुनाला नाहींच दिसला जयद्रथ
प्रतिज्ञानुसारी अग्निप्रवेशाला तेथेंच जहाला तो उद्यत
"येतों नारायणा!" बोले पार्थ वीर केलें चक्र दूर अकस्मात
'हा पहा आदित्य, हा तो जयद्रथ!' दावोनी स्व-भक्त केला मुक्त

१४

डोईवर पाटी, पाटीमध्यें बाळ पोटात उमाळ वात्सल्याचा
रात्रींच्या समयीं वर्षे मेघमाला यमुनेस आला महापूर
अहा! बालकृष्णा तुझ्या प्रेमभरें वसुदेव शिरे महापूरीं
बुडता स्वजन स्पर्शत चरण मिळाला तो क्षण दावी मला

१५

रामचंद्रराया ! भरताच्या शीर्षीं हस्त वनवासीं तू ठेविला
सांग तोच हस्त सीतापती देवा ठेवशील केव्हां मच्छीर्षाला
लक्ष्मण बंधु पडे भूमीवरी तुवा अंकावरी निजविला
रघुकुलनाथा ! त्याच अंकावरी घेशी केव्हां तरी सांग मला ?

१६

रामचंद्र तूच लक्ष्मण तूच भरत शत्रुघ्न बंधु तूच
तूंच ब्रह्मदेव तूच विष्णु-देव भोळा शंभुदेव तोही तूंच
इंद्र किंवा चंद्र सूर्य-ग्रहगण त्यांत संकर्षण एक तूच
विराट पुरुष विश्वही अशेष व्यापुनीया शेष राहे तूंच

१७

काय माकडांनीं राक्षस जिंकावे पाषाण तरावे जलधींत !
काय वानरांनीं उल्लंघावा अब्धि बोधावा दुर्बुद्धि लंकानाथ !
प्रत्येकाच्या शीर्षी रघुकुलदीपा तुझी होती कृपा अखंडित
कृपाळा ! कृपेसें दास करी धन्य जाईन तरून संसारांत

१८

मी तों आहें तुझ्या मुखाची बांसरी कंठाची माधुरी नाहीं माझी
मी तों नट आहें नाट्यसृष्टीवरी करीतों चाकरी राया ! तुझी
मी तों चित्र आहें सृष्टिपटावरी तुझ्या हातीं दोरी मद्देहाची
वरतीं चढीव खालतीं वा ओढ अंतीं देई जोड स्वत्पादांची

१९

वाट वाटसरू तुझी माझी जोडी तूं सिंधु मी होडी सर्वें दोन्ही !
नदी आणि थडी तुझी माझी जोडी आकाश-वादळी सर्वें दोन्ही !
चाप आणि दोरी तुझी माझी जोडी तू देह मी नाडी सर्वें दोन्ही !
वीणा आणि तार तुझी माझी जोडी तू आत्मा मी कुडी सर्वें दोन्ही !

बीज तूं निर्मळ, मी तरी अंकुर देंठ तू सुंदर, पाकळी मी!
पुष्प तू विहारी, पाखरू मी तरी वृक्ष तूंहि जरी, डहाळी मी!
समीर तू हरी, मी तरी लहरीं प्रकाश तूं जरी किरण मी!
तुजवीण माझें अस्तित्वच नाहीं तूं आत्मा, मी देही देहस्वामी!

२१

सूर्य तू तेजाळ, आहें मी कमळ चंद्र तू धवल, मी कुमुद!
मेघ तू सजल, आहें मी चकोर भव्य तू सागर, मीही नद!
आम्र तू रसाळ, आहें मी कोकीळ वायु तू शीतल, मी आमोद!
संकर्षण देवा! होंचि आकर्षण देई चिरंतन मज मोद!

२२

तुवां दिलें ज्ञान झालों ज्ञानवान त्याचा अभिमान मज नसो
तुवां दिली बुद्धि झालों बुद्धिवान गर्व तिळही न मज असो
कल्पना विचार तुझेंचि भांडार प्रतिष्ठेचा भार मज नसो
माझें जें जें कांहीं सुंदर असेल त्याचें सर्व मोल तुज असे

२३

नको गाजावाजा देवा मन्नामाचा तुझ्याची कीर्तीचा डंका वाजो
लोक-येरझारा नको मद्गेहास तुझ्या देवळास फेऱ्या साजो
नको मज मान तवपदलीन जगत संपूर्ण तुज भजो
मज भय वाटे, तुटो नाच कदा जाहला एकदां संबंध जो

२४

तुझ्या मंदिराचा पाषाण मी व्हावा पायीं तुडवावा संतांचिया
तुझ्या मंदिराचा छायावृक्ष व्हावा घडो साधुसेवा देहीं माझ्या
तुझ्या मंदिराचा व्हावा मी निर्झर मळो ही निर्भर माझी काया
पुरवावी आस आशेच्या दयाळा तुजवीण गेला क्षण वाया

२५

तुझ्या मंदिराची खालची पायरी बैसलों श्रीहरी तिजवरी
तुळशी मंजिऱ्या फुलें दोन चार बांधी पुजाभार निजकरी
उत्सुक दर्शनीं उत्सुक पूजनीं देतों ऐशा जनीं अत्यादरें
माझी हीच पूजा तुजला पावू दे स्मरण राहू दे निजांतरीं

२६

विटेवरी जागा तिळही असेल होईन मी तीळ पायासाठीं
विटेवरी जागा असो एक रेणू होईन मी रेणू तुझ्यासाठीं
विटेवरी जागा अणुमात्र असो अणुरूप वसों जगजेठी
माझा स्वर्गलोक तुझ्या पदधामीं अंतरींच्या उर्मी येती ओठीं

२७

इकडे तों सिंधु, तिकडे तों जाळ जेथें सुटकेला जागा नाहीं !
इकडे तों सिंह, तिकडे तों व्याघ्र जेथें जीविताची आशा नाहीं !
मानवी सामर्थ्य मानवी उपाय यांचा निरुपाय जेथे होई !
तेथें बा ! कोणाला देवा ! तुजवीण! वदावें वचन "त्राही त्राही" ?

२८

हसलों खेळलों आलों पायापाशीं देवा ! तान्हुल्याशीं कुरवाळा
भक्तीचा प्रसाद लाधा मन्मुखाशीं करू कोणापाशीं लडिवाळा
कळी उमलली फूल विकसलें परागही झाले सर्व गोळा
गळून पडलों आता चरणाशीं आदरावे याशीं जगत्पाळा

२९

पितांबरधारी-कोठें जाशी राया धरिले या पाया ना सोडीन
नको झिडकारू आधीं सांग मातें विनवूं कोणातें तुजवीण
दाटल्या हा कंठ रडेन मोठ्यानें तुज वात्सल्यानें मोहवीन
वैकुंठाच्या नाथा ! वैकुंठ पाहूं दे ! दाराशीं राहूं दे दुःखी दीन

३०

तुझ्या सृष्टीमाजी पक्ष्यासच पक्ष इथें परी पक्ष नानाविध!
तुझ्या विश्वामाजी इंदुलाच कला इथें मात्र कळा नानाविध!
तुझ्या राज्यीं दंड धर्माच्याच करीं इथें दंडधारी हिंडतात!
ऐसा तू समर्थ राहशी ज्या स्थानीं नेई चक्रपाणी वैकुंठात.

३१

दिसलें त्वद्द्वार हेंची माझे भाग्य काय मागू सांग द्वारापाशीं
पाहिली त्वन्मूर्ती झालें मत्साफल्य आता मागू काय तुझ्यापाशीं
जग माझें नाहीं जगाचा मी नाहीं निरिच्छेनें पाहीं या सृष्टीशी
ठेव हात माझ्या मस्तकीं दयाळा राहूं दे या बाळा चरणाशीं

३२

आज तुझी भक्ति उद्या भवासक्ति अस्थिर ही वृत्ती आधीं जाळी
सागरींचा धोंडा तळीं ठाव घेई तैशी वृत्ति व्हावी सर्वकाळीं
तत्वाचें विज्ञान ब्रह्माचें पुराण अडती चरण यांच्या जाळीं
भक्तिमार्ग माझा तुझ्या मंदिराचा सरळपणाचा वनमाळी

३३

देवा! तुझी इच्छा राजा मी असावें रंक कीं असावें संतोषी मी
प्रभो! तुझा हेतु उदासी असावें आनंदी असावें आनंदी मी
विभो! तुझा भाव विरागी असावें विलासी असावें विलासी मी
तुझ्या लीलेवरी माझें दैव नाचो दास मात्र असो पायाचा मी

३४

काय कुणी द्यावे काय कुणी घ्यावें व्यर्थ मिरवावा गर्व चित्तीं
सारेच भिकारी भेदाभेद ख्यात याचक-श्रीमंत सोंगें घेती
आज दातृवृत्ति उद्यां भिक्षावृत्ति ऐशा लोकस्थिति येती जाती
एक माझा दाता लक्ष्मीनारायण रिझवावें मन त्याच्या भक्तीं

२५

सौंदर्यानें जेव्हा नेत्र मोहताती    नेत्राना मी स्मृती तुझी देतों
ऐश्वर्यानें जेव्हा उपजे आश्चर्य    तुझें दानशौर्य आठवतों
औदार्यानें जेव्हा आनंदतों साच    बुद्धिदाता तूच तुला गातों
आनंदाश्चर्यांत आणि प्रमोहात    मिटल्या नेत्रांत तुला ध्यातों

२६

तुझ्या संकल्पांत विकल्प सोडीला    निंदू दे लोकांला लोकनाथा!
तुझ्या हेतुमाजी निर्हेतुक झालों    कुणी कांहीं बोलो भगवंता!
तुझ्या यदृच्छेंत निरिच्छ मी दास    आस देवो दोष लक्ष्मीवंता!
तुझी माया मातें समाधान देते    हसू दे जगातें जगन्नाथा!

२७

कुणाच्या का द्वारीं जावें रोज रोज    त्याच्या दारीं मौज रोज असे
यांच्या प्रेमानें का चालतो संसार    तोच चिंताभार वाहतसे
स्मरावें गृहांत जावें तद्द्वारांत    भजकांची रीत हीच असे
नेत्रापुढें एक धरियेली वाट    हनुमंत पाठ राखीतसे

२८

किती झिजवीलें लोकाच्या गेहाला    पाय ना वळला मंदिराला!
किती सोसियेलीं लोकाचीं बोलणीं    तुझा नामध्वनी नायकिला!
किती सांभाळिले लोकांचे स्वभाव    पूजा भक्तिभाव सोडियेला!
वाहतां वाहतां लागलों तीराला    शुद्धिवर आला जीव भला.

२९

तुझ्या उपकारीं बद्ध मज करीं    नको दारोदारीं पाठवूं बा!
तुझ्या स्नेहीं लाव माझ्या या मनाला    मनधरणीला त्रासलो बा!
तुझ्याची आधीन मज घे करून    किति पराधीन राहावें बा!
माझे डोळे आले अश्रूनीं भरून    पाठीशीं येऊन ठाक उभा?

४०

रागावलों भारी कृपावंतावरी    हंसला कैवारी पाठीमागें !
निर्दय म्हणालों दयासागराला    माझ्या कल्याणाला तोच जागे !
त्याच्या चित्तीं मज द्यावा 'रत्नहार'    मीच खोटी गार मागूं लागे !
अनुभव आला अंतरांत माझ्या    वागेन मी तुझ्या इच्छामागें !

४१

कुणी जप करी कुणी तप करी    कांहीं मीं श्रीहरी केलें नाहीं !
कुणी ध्यान धरीं धर्म कर्म करी    कांहीं मीं श्रीहरी केलें नाहीं
कथा वा कीर्तन पुराणश्रवण    कांहींच जन्मून केलें नाहीं !
आतां दोन्ही हात मस्तकीं जोडून    वंदितों चरण देवा पाहीं !

४२

तारिलें ध्रुवाला तेवीं प्रल्हादाला    अजामिळ त्याला तारिलें तूं !
द्रौपदी झांकिली तारा आश्वासीली    अहिल्याही भली उद्धरी तूं !
गजेंद्रकैवारी कालियाविहारी    गोवर्धनधारी शोभला तूं !
भक्तवात्सल्याच्या रमतों यशांत    तद्रूप मनांत कैचा कितूं ?

४३

गणिकेचें पाप गणिलें न तेव्हां    उद्धरिलें जेव्हां तूं तियेला
अहिल्येचें पाप गणिलें न तेव्हां    उद्धरिलें जेव्हां तूं तियेला
शबरीचें पाप गणिलें न तेव्हां    भाक्षियेलें जेव्हां तूं बोराला
प्रभो नारायणा माझें मात्र पाप    स्मरोनीं का ताप तुज झाला ?

४४

तेव्हां नाहीं काय तुज भार झाला    कोदंड सभेंत उचलीला ?
तेव्हां नाहीं काय तुज भार झाला    गिरी अंगुळीनें उचलीला ?
तेव्हां नाहीं काय तुज भार झाला    भूगोल दंष्ट्रेनें उचलीला ?
माझा मात्र भार तुजला जहाला    विलंब त्वां केला उद्धराया !

४५

आठवतों क्षण तुझिया कृपेचे  भिजती नेत्राचे काठ दोन्ही
ते ते जन होते पात्र त्वत्कृपेला  तुजही उमाळा त्याचा आला
मला मात्र स्मृती होता रडू येतें  तुझें माझें नातें आठवते
तुज हा पदरीं घ्यावाच लागेल  करावा लागेल दोष क्षमा

४६

तुका नामदेव यानीं केली भक्ती  मीही कां आसक्ती धरूं नये?
त्यांनीं केली तुझी बहु आळवणी  मी का विनवणी करूं नये?
त्यांनीं वाहियेलीं गंध फुलें ताजीं  मी का साधी माझीं वाहूं नये?
आवड निवड होवो ती लोकांत  तुझ्या अंतरात होऊ नये.

४७

फिरे मी काननीं चित्त बावरूनी  दुरोनिया कोणी हाक मारी
ओळखीचा शब्द पटवी ओळख  मूर्ती ना प्रत्यक्ष दिसे परी
लागली ओढणी चाललों त्या नादें  भेटीची प्रमोदें आस धरी
अजोनी तो सखा भेटलाच नाहीं  रडे उत्कंठा ही मदंतरीं

४८

बोलविशी राया! पैल तीराहूनी  मधें कल्लोलिनी येऊं कैसा?
घालोनी बंधन मागें ओढवीला  आणि मज केला जड ऐसा!
लागला मनाला तुझा छंद एक  म्हणतात लोक वेडा पिसा!
तूच उडी घाल नको अंत पाहूं  नको हा सुकवू माझा घसा!

४९

दुग्धाचा समुद्र गेला पसरोनी  कोठेंही अवनी दिसेचिना
शेषशय्येवरी नायक लक्ष्मीचा  निजे वैकुंठाचा तेथें राणा
हाक मारावया कोठें उभा राहूं?  जागा तिळ गहू दिसेचिना
ऐशा या स्थितींत राहावें सतत  तुटोनी जावोत बंध नाना

५०

बालकाचें कांहीं थांबेना रुदन भाऊ वा बहीण समजावी !
लागे वेगें आली माउली प्रेमाची मुद्रा बालकाची आनंदली !
दृश्य हें देखिलें रूपक जहालें उमलून आलें माझ्या पोटीं !
प्रभो ! माझे आई ! केव्हा धांवशील केव्हां तूं घेशील मज पोटीं ?

५१

तुझें तरी व्रत पतितोद्धाराचें नाहीं ढळायाचें कदाकाळीं !
मी तरी पापात नित्य लोळतसें पतितची असें सर्व काळीं !
तुझ्या ममतेचा अंतरात ठसा मळवीं शिशूसा देह धूळीं !
मुखें बोलतांही मज लाज नाहीं तूंच बापभाई मळ क्षाळीं ?

५२

जन्मापूर्वी माझें लिहिलें चरित्र वागतों मी मात्र संदेशानें !
माझें जें भविष्य बरें वा वाईट केलेंसी निश्चित तूं हातानें !
जन्माची पत्रिका आधीं तू लिहिली मागोनी लिहिली ज्योतिष्यानें !
त्यानें शुभाशुभ काय बा सांगावें म्यांहि आयकावें अज्ञानानें ?

५३

माझ्या सांचिताशीं तुल्य यत्सचित त्यांची या जन्मांत गाठ पडे
कोणी झाला बंधु कोणी झाला पुत्र दुहिता कलत्र प्रेम जडे
तुझ्या भजनाचे तुझ्या पूजनाचे गेहीं देतों साचे प्रेम -धडे
येथोल प्रसग बरे वा वाईट दाविलों मी बोट तुजकडे

५४

शेजारी कोपला मित्र रागावला दुर्मुख जहाला बंधुजन
लोकनाथ झाला रुष्ट अकारण भिई माझें मन लवही न
तूंच एक मात्र रुसू नको देवा ! माझा तूं विसावा चिरंतन
आकाश कोसळो माझ्या शिरावरी गीत 'हरी हरी' मी गाईन

५५

आजचे हे सारे लोक ओळखीले स्वजन जहाले परकीय
दोष नाहीं येथें आप्तांचा मित्रांचा दोष हा कर्माचा चिंतनीय
भले बुरे शब्द कानीं आयकावें मना! त्वा असावें सहनीय
पालटेल काळ तोंवरी स्मरावें प्रभुपद ध्यावें पूजनीय

५६

वेळोवेळीं देवा! चुकलों असेन कठिण हें मन कोठवरी?
बोध विसरून वागलों असेन परी आतां मौन कोठवरी?
पसरिले हात दृष्टि गगनांत नेत्र भरतात बाष्पपूरीं?
झुकल्या नावेला धरी सांवरून करी उद्धरण हरी! हरी!

५७

ह्मणतात साधु तुज विश्वपाळ माझा प्रतिपाळ तरी कीजे
कृपेचा सागर तव हा महिमा तरी पुरुषोत्तमा! कृपा कीजे
सङ्कटांचा हर्ता सर्व सुख दाता हरोनी मच्चिंता सुख दीजे
तुझीं विशेषणें रजवीती चित्ता प्रचीती अनंता! मज दीजे

५८

लुठक होवोनी येशी ये माधवा! माझा त्वा लुटावा पापराशी
छेदक होवोनी येशी अधोक्षजा! विच्छेदी या माझ्या संमोहाशीं
मारक होवोनी येशी विभो! यावें माझ्या या मारावें दारिद्र्याशीं
हारक होवोनी येशी ये हरी! तू हर जन्ममृत्यु—भ्रमणाशीं

५९

समुद्रास लाटा आल्या गेल्या किती तयानें गणती केली नाहीं
किती वेळा भूमि हाले भूकपानें गणती तियेनें केली नाहीं
ग्रहणाची पीडा रविचंद्र याना तयांनीं गणना केली नाहीं
संसाराचीं दु:खें येवोनिया गेलीं पुढच्या पावलीं मागे पाहीं

६०

“ एक वेळां दिलें माझिया दाराशीं पुन्हां कां आलासी?”-बोलूं नको
कुबेराचा धनी तुज काय कमी लक्ष्मीचा तूं स्वामी विटूं नको
तुझ्या भिक्षेवरी मौज आम्ही करूं छंद तुझा धरूं कोपूं नको
विन्मुख त्वा केलें सांग बा कोणास? धृष्टतेचा दोष लावूं नको

६१

त्र्यंबकेश्वरांत मान शंकराला तेथें श्रीदत्ताला कोण पूजी ?
गाणगापुरांत मान श्रीदत्ताला तेथें श्रीकृष्णाला कोण पूजी ?
द्वारकेंत मान यदुभूषणाला तेथें विठ्ठलाला कोण पूजी ?
एक नारायण नटला हो मात्र स्थान महात्म्यांत जगामाजीं

६२

जेथें काम क्रोध लोभ प्रमोहाची सीमा विकारांची ओसरली
क्षुधा तृषा झोंप हास्य वा विलास बुद्धी या सुखास विसरली
एक मात्र भक्ती आकाश धरित्री व्यापोनी दिक्प्रांतीं पसरली
चला जाऊं ऐशा चंद्रभागातीरीं मुक्तीची साजिरी मूर्ती ठेली

६३

दूर क्षेत्रवासी ऐकिलें कीर्तीशीं पाहूं त्वन्मूर्तीशीं इच्छा ऐशी
मार्गीं तव ध्यान करितां त्वद्गान श्रम भासती न शरीराशीं
उत्कंठायोगांत प्रीतीच्या साह्यानें भक्त ये भक्तीनें द्वारापाशीं
निष्कांचन योगें बडव्यांनीं कांहीं येऊं दिलें नाहीं पायापाशीं !

६४

एकादशी-दिनीं तुझ्या भेटीसाठीं झाली लोक-दाटी पांडुरंगा !
शक्तिमंत गेले तुडवुनी पायीं दीन ' आई आई ' रडले गा
त्यांचे अश्रु कोणी पुसायास नाहीं कोण त्यांच्या पाहीं देहभंगा !
उद्यां आनंदानें वंदीन चरण रक्षूं आज दीन हे श्रीरंगा !

६५

कमलाभोंवतीं दाटतें शैवाळ सारोनी मराळ पद्म सेवी
डाळिंबाभोंवतीं त्वचा सत्वहीन शुक विदारून बीज सेवी
उद्यानाभोंवतीं कांटेरी कुंपण भृंग ते लघून पुष्प सेवी
विठ्ठलाभोंवतीं बडव्यांचा मेळा सारोनी प्रभूला भक्त सेवी

६६

उद्यां भूकंपांत तनु चिरडेल मनीं आठवूं दे मूर्ति आजी
उद्यां गांठ असो त्रिकाळ काळाशीं शिर लववूं दे पायीं आजी
उद्यां प्रळयांत देह हा बुडेल करोनी घेऊं दे भक्ती आजी
उद्यां होणारें जें होवो तें श्रीरंगा चरणीं अभंगा बुद्धि माझी

६७

माझ्या निर्धारास तुझाची आधार भक्ताचा कैवार तुवां घ्यावा
हाकारिली नाव तुझ्या नांवावरी शीड आणि दोरी नाहीं देवा!
माझी तों प्रतिज्ञा होवोनिया गेली आतां वनमाळी! धीर द्यावा
निश्चयी मत्कंठ निर्वाणीचें गान करितो स्मरून भक्तिभावा

६८

साखरेशीं मांगी सोडिते न जैशी मति माझी तैशी तुझ्याठायीं
पद्माशीं भ्रमर सोडितो न जैसा माझा भाव तैसा तुझ्यापायीं
तुझ्याच रसाची लागली चटक कोणाचाहि धाक नाहीं नाहीं
असो मी पामर असो मी किंकर ठाकोनी समोर तुज बाही

६९

दयासागराच्या दर्शनाची हौस दयानिदिध्यास तो असावा
शांतिसागराच्या संगतीची आस शांतीचा अभ्यास आचरावा
जगत्कल्याणाचा त्याचा परिपाठ आपण तो पाठ गिरवावा
तुल्य गुणयोग असल्यावांचून दावी कोणीही न स्नेहभावा

७०

चन्द्राविण जैशी रजनी शोभेना   धरित्री शोभेना मेघाविना
कुंकुमविहिना सुंदरी शोभेना   वाटिका शोभेना पुष्पहीना
सुंदरीची वेणी निष्पुष्प शोभेना   वाणी ती शोभेना कृतीविना
तव स्मृति जिव्हा वाचनीं होईना   कविता शोभेना तुजविना

७१

इंद्रधनु दिसे आकाशाच्या द्वारीं   परी धनुर्धारी दिसेचिना
धूमकेतूचाहि ध्वज दिसे भव्य   ध्वजपती दिव्य दिसेचिना
तारा नक्षत्रांची दिसे सेनापंक्ती   परी सेनापती दिसेचिना
करा जयघोष नांवानें तयाच्या   जपतो जगाच्या जो कल्याणा

७२

कोणी ह्मणे ठेवा विष्णुपदीं भाव   कोणी म्हणे शिव आळवावा
कोणी ह्मणे जपा मुखीं 'राम' नाम   कोणी म्हणे 'शाम' आळवावा
कोणी ह्मणे 'अंबा' भजावी सुचित्त   कुणी म्हणे 'दत्त' कीं पूजावा
एका मूर्तीवरी टाकोनिया भार   मग व्यवहार चालू द्यावा

७३

कर्ता करविता धनी असे एक   सोडिलें उदक त्याच्यापायीं
साधु संत गेले चालोनी ज्या मार्गी   उमटलीं मार्गी चिन्हें कांहीं
कपाळीं ती माती लावून वंदितों   मार्ग आक्रमितों माझा मीही
अनुभवजन्य त्यांचें बोध-जल   प्राशाया निर्मळ तोष देई

७४

तेच तेच नेत्र, ज्यांच्यात पवित्र   हरिरूप चित्र ठसलेलें!
तेच तेच कर्ण ज्यात भावपूर्ण   हरिगुणगान भरलेलें!
तेच तेच पाद तीर्थ स्थानावर   प्रेमें वारंवार वळलेले!
तोच तोच देह टाळ वाजतांच   ज्यावरी रोमांच उठलेले!

७५

नाना मंदिरांत नाना देवतास लववावें शीर्ष भक्तिभावें
नाना धर्मांतील नाना साधुसंत मन तद्बोधांत रमवावें
सर्वाठायीं एक भरला अनंत तत्व हें चित्तात ठसवावें
राहावें संसारीं संतोषस्थितींत उपकारव्रत आचरावें

७६

दुःख वाहतसे दारिद्र्याचें कोणी पुत्रास्तव कोणी झुरतसे
संतती संपत्ती यांचा लाभ जेथें हव्यासची तेथे रडतसे
जगतात नाहीं कोणी समाधानी संताच्या वचनीं अनुभव
तेच समाधानी मनास जिंकीती ठेविती हरीशीं दृढभाव

७७

'माझा कृष्ण मोठा' भीमसेन म्हणे 'राम मोठा' म्हणे हनुमान
भीम गदा घेई तोंच हनुमानें दाविलें पुच्छानें तारागण
खालीं 'राम' ध्वनी वर 'कृष्ण'ध्वनि धावे भक्त-धनी भगवान
राम तोचि कृष्ण, कृष्ण तोचि राम होई दासोराम समाधान

७८

उद्यनांत पुष्पें, पुष्पांतरीं गंध गंधांत आनंद भरलेला
आकाशांत गोल गोलांत प्रकाश प्रकाशांत हर्ष भरलेला
भोपळ्याची वीणा वीणेची जी तार तारेंत सुस्वर भरलेला
जगीं नाना लोक लोकांतरीं भाव भावांतरीं देव भरलेला

७९

जाई जुई यांचे मंडप फुलले पल्लवीत झाले पारिजात
कण्हेर केतकी पुष्पें डवरल्या गुलाबास कळ्या देठोदेठ
पाना पाना आड गोकर्णांची फुलें जासवंद झाले अंकुरित
सृष्टिसौंदर्यांत नटला जो ईश पहावें तयास उद्यानांत

८०

विशाल पर्वत, वाहतात झरे कानन विहरे घनदाट
मध्यें सरोवर निर्मळ भरलें फुलांनीं शोभले ज्याचे काठ
हरिणांचीं बाळें खेळती स्वच्छंद गाती खगवृंद काव्यपाठ
कुटिका बांधोनी तेथेंची राहावें हरि-गीत गावें मुक्तकंठ

८१

कळसावांचोनी मंदिर शोभेना नगर शोभेना नदीविना
शिखरावांचोनी पर्वत शोभेना दुर्ग तो शोभेना ध्वजाविना
शिखेवांचोनीया मयूर शोभेना कानन शोभेना वृक्षाविना
प्रतिभेवांचोनी कविता शोभेना पूजाही शोभेना भक्तिविना

८२

सरोवरावीण कमल शोभेना लतिका शोभेना वृक्षाविना
मानसाव्यावीण हंस तो शोभेना कोकिळ शोभेना आम्राविना
कोंदणावांचोनी हीरक शोभेना पयोद शोभेना नभाविना
वेदाभ्यासावीण ब्राह्मण शोभेना जीवित शोभेना भक्तिविना

८३

आकाशाची सीमा कोणीं ठरविली कोणीं गणियेली तारापंक्ति
समुद्राच्या तळीं अमूप जीं रत्नें कोणीं किती यत्नें मोजिलीं तीं
वसुधेच्या पोटीं द्रव्यें भरलेलीं कोणी ठरवीली त्यांची मिती
भक्ताच्या चित्तांत ईश्वरी भावना करीतां येईना तद्गणती

८४

पाप करी पापी शिक्षा ना तयाला "देव झोंपी गेला" बोलूं नको
भक्त करी भक्ती फळ ना तयाला "देव झोंपी गेला" बोलूं नको
बीज लावियेलें आलें तें फळाला "देव जागा झाला" बोलूं नको
आचरोनी कर्म भोग तूं कर्माला उणें दैवताला लावूं नको

८५

मज आसवील दु:ख हा देईल भीतीनें गोपाळ भजूं नको
मानियेलें ज्याला सोडूं नये त्याला व्यर्थ संशयाला सेवूं नको
तुझ्या हृदयात उमटतो नाद त्याच्याशीं विवाद घालूं नको
तोच आहे देव तोच आहे धर्म अंतरींचें मर्म सोडूं नको

८६

विदुराच्या गेहीं भाजी भाकरीला सेवून तुष्टला नारायण !
रोहिदास गेहीं वडा भक्षियेला चांभार जाहला नारायण !
दुधभात खाई शिंप्याच्या सदनीं वैकुंठाचा धनी शिंपी झाला !
आपुल्या पुरींत[1] समग्र जातींला एकाच पंक्तीला बैसवीलें !

८७

ज्ञानी व्हावें ऐसें तुज वाटे जरी साधुसंग करी निरंतर
ध्यानी व्हावें ऐसें तुज वाटे जरी हरीस अंतरीं भज तरी
यती होणें तरी अहिंसा आचरी कीर्ती हवी तरी पुण्य करी
मागायाचें तरी हरीच्याच दारीं पदर पसरी झडकरी

८८

सर्पासवें जैसा गरुडाचा दावा गजासवें दावा केसरीचा
इंद्राच्या वज्राचा शैलासवें दावा पक्ष्यासवें दावा काकोलाचा
मेघासवें जैसा पवनाचा दावा तमासवें दावा सूर्यांशूचा
किंवा अग्निसवें सलिलाचा दावा दु:खासवें दावा हरिनामाचा

८९

नास्तिकवादी जे त्यांच्या संगतींत श्रद्धा घटे सत्य अनुभव
नित्य परगेहीं जाऊन जाऊन घटे निज मान अनुभव
प्रीती घटे स्नेहीं याचना करून यासही प्रमाण अनुभव
परी यम-त्रास घटे, हरि-गुण गाऊन गाऊन अभिनव

---

१ जगन्नाथ पुरींत

९०

पागोटें गळालें जहालें दुश्चिन्ह     निघाला त्यांतून विंचू एक
आडवें मार्जार थांबवी मार्गांत     गेला फोंफावत सर्प एक
शुभ फलदायी दुश्चिन्हें जहालीं     तरी बुद्धी झाली ना निःशंक
जगत्कल्याणाचा प्रभु मात्र ज्ञाता     कर्ता करवीता तोच एक

९१

एकाहातीं माती एकाहातीं सोनें     मोल एक जाणें साधु त्यांचें!
एकाहातीं काच एकाहातीं हिरा     मोल योगीश्वरा एक त्यांचें!
एकाहातीं लोह दुज्यांत परीस     मोल तपस्व्यास एक त्यांचें!
इह वैभवाशीं नि सारिलें ज्यांनीं     जाहले हो धनी ते मोक्षाचे!

९२

श्वापदांत करी, करीहुन हरी     हरीहुन तरी मोठा कोण?
पक्ष्यांमाजी हंस, हंसहि गरुड     त्याशीं वरचढ तरी कोण?
वृक्षीं गंधवृक्ष, त्यांतही चंदन     सांगा त्याच्याहून श्रेष्ठ कोण?
नरामाजीं योगी योग्यांत गुरुही     गुरुहुन महीं मोठा कोण?

९३

वापी तडागांत आहेच सलील     भागीरथी--जल परी सेव्य
वनोपवनांत आहेच चंदन     मलयचंदन परी सेव्य
नदी निर्झरांत असती पाषाण     रेवा-शालीग्राम परी सेव्य
घरींदारीं जो तो करीतोच बोध     सद्गुरूचा बोध परी सेव्य

९४

"देव कोठें आहे?" पुसिलें निक्षून     जो तो भिन्न स्थान दावितसे!
साधूनें दाविलें काशीकडे बोट     फकिराचें बोट मक्केकडे!
ख्रिस्तधर्मज्ञानी त्याशीं पडे गांठ     त्यानें नेलें बोट नभाकडे!
घटा घटा माजी देव भरलेला     गुरूनें दाविला शेवटीं हो!

१५

बकुलाचा वृक्ष फुलला फुलला वेंचाल पुष्पांला कोठवर?
स्वातीचा पाऊस वर्षला वर्षला. गणाल मोत्यांला कोठवर?
आकाशींचा कोश उघडा जहाला मोजाल रत्नांला कोठवर?
गुरुही वाणीनें उत्फुल्ल जाहला वेंचाल तत्वांला कोठवर?

१६

सदाचारची जी मूर्तीच केवळ स्वभाव प्रेमळ ज्याचा असे!
ज्यास पाहतांच विद्यार्थी जनांची वृत्ती आनदाची नित्य दिसे!
माता-पिता-गेह यास विसरवी वर्णावी थोरवी काय त्याची?
ऐसा अध्यापक दैवानें लाभतां होई सफलता आयुष्याची!

१७

कुंभच जणों कीं मधुर ज्ञानाचा प्रवाह रसाचा मनोहर!
शीलानें निर्मळ पुष्प निर्गिगध जयाचा सुगंध मनोहर!
लेखन वाचन तैसें अध्यापन यांत जो विलीन निरंतर!
ऐसा अध्यापक मोल जगीं त्याचें द्रव्यानें का साचे ठरणार?

१८

भूमितल ज्यांच्या यशें उजळलें दिकतट रंगले ज्यांच्या यशें
विद्वच्चूडामणी धर्मवीर कोणी देशभक्ताग्रणी वीर तैसे
पुसा जा तयांना त्याचा इतिहास त्यांच्या वचनास साक्ष नसे
खरा अध्यापक एक होय जरी देश भाग्यावरी चढतसे

१९

"गुरु महाराज" "गुरु महाराज" मुखें शिष्यराज बोलतसे!
तत्वांसाठीं प्राण देणाऱ्यांची मान ढोंगी धर्महीन कापीतसे?
गादीचा तो गुरु साधाभोळा प्राणी शिष्यांची करणी नेणतसे?
गुरु आणि शिष्य किती नांदतात खोट्या लौकिकांत लोकीं ऐसे

३८९

१००

देहानें संन्यासी मनानें सन्यासी गुरु केला त्यासी आवडीनें
पचवू पहाती त्याची वाटखर्ची काशीच्या यात्रेची कपटानें
मागूं जातां ' टाक खावटीचा खर्च? दावियेला दर्प मुसळानें
जित्यापणीं केली ऐशी दैना दैना आतां पादुकांना पुजताती

१०१

पढरीचा मार्ग आक्रमितो कष्टीं जेजूरीच्या गोष्टी बोलतसे!
पंढरी—पढरी विठ्ठल नगरी खंडोबाची वारी मागतसे!
मार्तंडाचा लावी भंडार कपाळीं बुक्का लोकभालीं लावीतसे!
एक देव नाहीं एक भाव नाहीं द्वैतभक्ति का ही पावतसे!

१०२

सोनियाचा देव होता देव्हाऱ्यांत गेला अकस्मात दिसेना तो
एथें होता, कोठें गेला रंगनाथ भक्ताच्या नेत्रांत पूर येतो
सुचेना कांहीही वावरूनी चित्त जीव कासावीस तेणें होतो
सोन्यासाठीं सारा चालला आकांत जाणे भगवंत सर्वज्ञ तो

१०३

सोनियाची मूर्ती सोनाराने केली भक्तालाच झाली वरदाई
मातीचा गणेश कुंभारानें केला इष्ट भजकाला फल देई
पाषाणाचा देव पाथरवटें केला पावे भविकाला लवलाही
भक्तीच्या भावना ज्याच्या अंतरांत त्याच्या कल्याणात देव राही

१०४

भक्ताचें भूषण भक्ती हेंच जाण भक्तीचें भूषण धर्मज्ञान
ज्ञानाचें भूषण आत्मरूप ध्यान ध्यानाचें भूषण त्याग जाण
त्यागाचें भूषण अविचल शांती ऐसे वदताती मतिमान
ऐशा भूषणांनीं नटला जो देहीं होई त्याच्या पायीं सुविलीन

१०५

अस्वलाची वृत्ती बरवी बरवी राहावें एकटें शैलांतरीं
मधाचीं तीं पोळीं शोधावी फिरोनी,खावीं संतोषोनी गोडगोड
कवि-मधमाशा त्यांनीं जमविलीं भक्तीचीं जीं पोळीं शोधावीं तीं
अमृतासमान करावें सेवन राहावें पडून काननांत

१०६

कृपण साठवी कण कण धन करितो जतन रात्रंदिन
नाहीं तो बोलत कोणास दावित परी राही त्यांत त्याचें मन
तैसा हरि-दास भक्तींत विलीन वायां दवडी न एक क्षण
आपुल्या भक्तीस नाहीं तो वानीत परी राही नित तींत लीन

१०७

सिंहा कडोनीया त्याजला खावबा हत्तीशीं बांधवा नेवोनीया
तीव्रशूलावरी अथवा चढवा विष कीं पाजवा घोळोनीया
किंवा शरिरास वृश्चिक डसवा भुजगी लोळवा ओढोनीया
भक्त जो जहाला प्रभूशीं विलीन मुख दाखवी न संसारीं या

१०८

अग्नीमाजी लोटा पाण्यांत बुडवा शस्त्रानें विंधवा करा कांहीं,
खणोनी कीं खाडा भूमीमाजी गाडा कडयाहून पाडा करा कांहीं,
अन्नपाण्याविण कोंडोनीया ठेवा नश्वर तद्देहा करा कांहीं,
परी नारायणीं रंगलेलें मन वळाया तेथून शक्त नाहीं !

१०९

समुद्रास लाटा असंख्य उठती त्यांतच विरती सर्वकाळीं
नभीं वर्षामेघ किती उद्भवती त्यांतच विरती शरत्काळीं
गिरीं वनस्पती किती उगवती तेथेंच वाळती उष्णकाळीं
भक्तीच्या लहरी तेवीं भक्त-चित्तीं उठती विरती वेळोवेळीं

११०

भाविकाच्या संगें गांवच निघाले मेळा त्यांचा चाले तीर्थमार्गे
शीतोष्णाच्या तापें चालून चालून गळाले त्यातून काहीं मार्गे
उरलेले लोक चोरांनीं गाठीले त्याच्या त्रासें आले कांहीं मार्गे
शेवटीं जे होते श्रीरंगीं रंगले तेच पोहोंचले भक्तियोगें

१११

तुझें एक ध्यान हरपलें भान नादांत रंगून हार केला
परिमलहीन सौंदर्यविहीन माझी ही अर्पण पुष्पमाला
तूच शबरीच्या सेविलें बोराला प्रेमाचा उमाळा ओळखीला
नको दोष पाहू दास मी पायाचा असू दे खुणेचा माझा शेला

११२

रूप लावण्यानें संपन्न सुंदरी गवाक्षा बाहेरी मुख काढी
पाहियेलें दोघा कवींनीं तियेला लागे वर्णनाला कवीजोडी
एक ह्मणे "खालीं नभश्चंद्र आला" झरोका झाकला तों वायूनें
"लावण्याचा कोश विवृत जहाला झांकला झांकला!"-दुजा ह्मणे.

११३

कोणी ह्मणे कवी राधेचें वदन सरोज नवीन कासाराचे
लावण्याचा कोणी मानितो आदर्श गमे कुणा दृश्य अप्सरेचें
ह्मणे कुणी खालीं शशि-रत्न आलें प्रारब्ध उदेलें वसुधेचें
मला मात्र वाटे कनकलतेंत विकसलें पुष्प तें तेजाचें

११४

मानव निर्मीले दानव निर्मिले पशु निर्मियेले विहंगम
नद्या ओढे नाले तुंग शैलमाला निर्मोनी रंगला परंधाम
राधेस निर्मिलें मात्र ज्या रसानें केला चंद्र त्यानें तेजोधामें
ओले होते हात शिंपिले भोंवतीं झाली तारापंक्ती ही ललामे

११५

चंद्रमा हा नोहे, कारजें स्वर्गीचें तारा नोहे, त्याचे जलबिंदु !
विश्वमाता वाही सुधेचा कीं घट त्याचे गळतात बिंदु बिंदु !
सागर-मथनीं रत्न वर आले फेसाळला वाटे नभःसिंधु !
ब्रह्मांडाची आई तिचा गौर-स्तन गळती त्यांतून पयोबिंदु !

११६

आकाशगंगेच्या पुण्य जलकांठीं कल्पवृक्ष दाटी जाहली जी
तेथोनी भामेच्या प्रेमळ दासींनीं आणिलीं वेंचोनी पुष्पें ताजीं
पारिजात-पुष्प पाहतां शोधोनी येईना दिसोनी पुष्पांमाजी
तिनें रागें रागें फुलें उधळिलीं तीच ही शोभली ताराराजी

११७

रामसहायक वनाचे वानर जाहले अमर देवरूप
कृष्णाचे सांगाती गोपगोपीजन सुख तत्स्मरण दे अमूप
गोपरासक्रीडा हनुमज्जयंती दिसे उत्सवांतीं लोकानंद
लोकार्थ धर्मार्थ होती अवतारी त्यांचे साह्यकारी लोकवंद्य

११८

महात्म्याचें झालें दुर्लभ दर्शन धन्य तोची दिन समजावा
पतिव्रता नारी भेटली मार्गांत धन्य तोची क्षण ओळखावा
ज्यांच्या चारित्र्याचा सदाचरणाचा आपणास साचा बोध व्हावा
ऐशांचीं दर्शनें नित्य नाहीं होत ईश्वरी संकेत तो जाणावा

११९

सदाचार-फळ लोकीं धन्यवाद त्याहून कोणतें स्वर्ग सुख ?
दुष्कर्माचें फळ लोकांत धिक्कार त्याहून कोणतें नर्क दुःख ?
दुष्टांची दुष्कीर्ति सज्जनाचें यश खुले जगतास दोन मार्ग ?
निवडोनी घ्यावा ज्याचा त्यानें पंथ गांठावा निःशंक नर्क-स्वर्ग !

१२०

आधीं घडे इच्छा, इच्छेपुढें मोह मोहावरी मोह वाढतसे
सफल मोहाचें वाटे लाभ-सुख निष्फलाचें दु:ख जाळितसे
ज्यांनीं मूळ इच्छा दाबून टाकिली नियोगी भूतलीं किती ऐसे
त्याच्या सेवेमध्यें देह झिजवावा काळ घालवावा सहवासें

१२१

जिथें आशा गाई उदासीचें गीत भावी निजहित तेथें वसे
जिथें मनोवांछा होतसे करुण भावी स्वकल्याण तेथें वसे
दैवी अनुभव येतसे पुढतीं औषधाच्या अंगीं गुण ऐसे
ह्मणोनी विद्वान क्षणिक जें दुःख त्यात विमनस्क होत नाहीं

१२२

घातकी पातकी सुखानें नांदती न्यायनिष्ठ मती खिन्न होई
देखोनी जन्माचे मुके वा आंधळे कारण ना कळे शोधोनीही
पूर्वसंचिताचें मानाया अस्तित्व लावितात सत्य गोष्टी दोन्ही
ह्मणोनी सज्जन विषम जगात सत्कर्म करीत सदा राही

१२३

दोन भिन्न मार्ग दिसतात जेथें विवेकास तेथें आदरावें
सत्य मार्गावरी ठेवावें पाऊल झाली जरी भूल, मागें यावें
ओळखीचे लोक पाहोनी हंसोत ठेविलीं ठेवोत कोणीं नावें
कर्तव्याची कास धरावी अंतरीं यशाच्या मंदिरीं नीट जावें

१२४

माता वैर धरी, मारूं पाहे पिता उपाय कोणता तरी कीजे?
प्रेमें यद्वाहूच्या जावें आश्रयाला उचली वाहूला काय कीजे?
जाणोनी अजाण होतो आपणाला कैसा तजीवाला जीव द्यावा?
कुंपणच खाई शेतास उपाय सांगा तरी काय तो योजावा?

१२५

खाटिकाचे दारीं बोकडाचें तप   मृत्युंजय-जप तो करीतो
कसायाच्या दारीं बद्ध पशु नित्य  उपोषण व्रत आचरीतो
पारध्याच्या दारीं मृग स्वलोचन   झांकोनीया ध्यान तो धरीतो
जीव आणि मृत्यु याच्या संयोगांत   काळाचाच पट आडवा तो

१२६

केळीच्या शेजारीं वृक्ष तो बोरीचा  वास न तयांचा समुचित ;
बोर डोले जेव्हां समीरानदानें    फाटे अंग तेणें कदलीचें !
हिंसका शेजारी अहिंसक तैसा   राहे तरी कैसा संतोषानें ?
एकाचा जो सण दुज्याचा दुर्दिन   खेदाचें कारण नेहमींच !

१२७

निर्झर निर्झरा जिथें भेटताती    दोन्ही आलिंगीती नदीलागीं
लता लतेलागीं वृक्ष वृक्षांलागीं   लतावृक्ष-कुंज जागजागीं
मयूर कोकीळ गाती खग जाती  मृग-धेनु-पक्षी चरताती
मानवांनो ! सोडा अहंतेचा कांठ  ऐक्याचे घ्या पाठ काननांत

१२८

वैशाखाच्या मास बहार आंब्यास  झाला कावळ्यास मुखरोग !
पौष-माघ मास बहार बोरीस    झाला घुबडास नेत्र रोग !
भोग्य वस्तु आहे, आहे भोगेच्छाही  दैवेच्छाच नाहीं दैवयोग !
दुर्मुखी जीवांना कैचें लाधायाचें  रुचिर वस्तूचे उपभोग ?

१२९

छायारूपें येई वसंत वनास    सुंदर आम्रास फुलवितो
त्याच्या शाखेवरी बैसली कोकिळा  मधुर तिजला गावबितो
तैसा अवतरे विभु तेजोमय    कवीचें हृदय फुलवितो
अमृतासमान परम मंगला    वाणीची कोकिळा गावबितो

१३०

धनुष्याचा बाण ओढोनी सोडिला परतोनी आला काय केव्हां ?
तोफेचा जो गोळा एकदां उडाला परतोनी आला काय केव्हां ?
शैलशृंगाहूनी प्रपात उडाला मागें ओसरला काय केव्हां ?
सज्जनाचा शद्ब एकदां निघाला मागें घेई त्याला काय केव्हां ?

१३१

खडगाची धार, सज्जनाचें व्रत दोन्हीही तिखट कर्तव्यांत !
चापाचा टकार, शूराचा हुंकार दोन्हीही गभीर श्रवणांत !
तत्वज्ञांचा वाद, साधूचा प्रसाद दोन्हीही अगाध मडळांत !
विद्युलता-पात, सतीचा निश्चय दोन्ही अनिवार्य भूतलांत !

१३२

साधु नच सोडी साधुत्व आपुलें असाधु मिळाले जरी त्याशीं
चदन सोडीना निजशीतलता सर्पाची मित्रता जरी त्याशीं
सुगंध सोडीना कस्तुरीचा मृग आला मृत्युभोग जरी त्याशीं
सतीही आपुलें सतित्व सोडी न कशाही कठीण समयासीं

१३३

पतीशींच प्रेम पतीशींच नेम पतींनेंच क्षेम ससारांत
पती हाच यज्ञ पती हाच योग पति रसभोग धर्मश्रुत
पती ज्ञान-ध्यान पती पुण्यदान पति तीर्थस्थान सुविहित
पतीवीण देव सतीलागीं नोहे आर्यस्त्रियेला हें सुविदित

१३४

बरवा तो चंद्र दूर आकाशांत ज्या योगें चकोर संतोषती
बरवा तो सूर्य दूर गगनांत ज्या योगें सरोज प्रफुल्लती !
बरवा तो मेघ दूर अंबरांत ज्या योगें चातक आनंदती !
जोंवरी सद्गुणी अलिप्त रहाती तोंवरी महती पावताती !

१३५

गंगातीर-मुक्ती योलती बरवी वसती बरवी श्रीक्षेत्राची
साधु-सज्जनांची संगती बरवी लालसा बरवी भजनाची
धर्मविषयींची आवड बरवी प्रीती ती बरवी श्रीकृष्णाची
ज्ञानवर्धनाची जिज्ञासा बरवी उत्कंठा बरवी वेदांताची

१३६

तोंवरी तोंवरी राग तो बरवा जेणें दोष जावा स्वजनांचा
तोंवरी तोंवरी प्रीतीही बरवी पथ न सोडवी मर्यादेचा
तोंवरी तोंवरी मित्रता बरवी भाव न जाणवी अहतेचा
तोंवरी तोंवरी जीवन बरवें उद्योग करवे सत्कीर्तीचा

१३७

हिरव्या वेलींनीं काट्यांचें कुपण झांकोनी नूतन शोभा येई
शुभ्र जलौघानें पापाण लोपती तुषारांची पंक्ति तोष देई
पुष्पवृक्ष-वेली यानीं वेष्टिलेली कुटिकाही झाली मोददायी
जगतीं जे हीन योग्यताविहीन श्रेष्ठपदीं लीन होवो काहीं

१३८

वटपिंपळाच्या सगें निंब वाढे लोक हात जोडे त्रिवेणीला
नद्यांच्या संगमीं, ओहोळ मिळाला लोक ये स्नानाला त्रिवेणीला
संतसाधु-सगें पोटभरू चाले तिथे वंद्य झाले भाविकाला
दोघांच्या पावित्र्यीं, तिसरा पवित्र मानण्याची रीत जगताला

१३९

आंब्याला का कोठें तोरणें बांधावीं लागतात लोकीं सत्कार्याशीं ?
दिव्याच्या ज्योतींत सूर्योपासकास बघावें कां लागे त्या सूर्याशीं ?
मैलागिरिदेहीं चंदनाचा गंध लावावा लागे का पूजनाशीं ?
मूर्त पावित्र्याचे मूर्त सद्गुणाचे मांगल्य तयांचे संन्निवाशीं !

१४०

फणसाची गोडी सेविता सेवितां  कंटकांची निंदा कशाला हो!
चंदनाचा गंध लाविता लाविता  सर्पसंग-वार्ता कशाला हो!
कोकिळाचा स्वर ऐकतां ऐकता  त्याची जन्मकथा कशाला हो!
गुणश्रेष्ठ जे जे गुणानंदीं त्यांच्या  अवगुण-चर्चा कशाला हो!

१४१

धेनूचें पायस परम पवित्र  मुख अपवित्र असो असो
निंबाचा तो गाभा चंदनाशीं तुल्य  कटु वृक्षमूळ असो असो
द्राक्षफलामाजी मधुरस-धारा  तिच्यात मदिरा वसो वसो
करायाचा काय दोष आपणाला  उत्कट गुणाला मान असो

१४२

कुसुमाची शोभा दुरोनी पहावी  शरीरीं नखही लावूं नये
कोकिळाची वाणी दुरोनी ऐकावी  मधें कटुवाणी बोलूं नये
मोराचा पिसारा दुरोनी पहावा  कांहीं आविर्भावा दावूं नये
नैसर्गिक गुणी गुणमग्न होतां  आपण धृष्टता सेवूं नये

१४३

कमलानें व्हावें सर्वांगीं प्रफुल्ल  भ्रमर येतील आपोआप!
कुमुदानें व्हावें सौंदर्यें उत्फुल्ल  चकोर येतील आपोआप!
फुलो काननांत आम्र तो रसाळ  येतील कोकीळ आपोआप!
तैसा गुणवंत पसरो स्वगुण  येतील गुणज्ञ तत्समीप!

१४४

बैसला बैसला कोकीळ उडाला  आम्रानें तयाला दोषूं नये!
खेळला खेळला हंस दूर गेला  पद्मिनीनें त्याला निंदूं नये!
बोलला बोलला शुक स्तब्ध झाला  गुणज्ञानें त्याला बोलूं नये!
रसिक सुगुणी असती स्वच्छंद  तेणें सर्वनिंद्य मानूं नये.

१४५

घरचाच वैद्य झाला ह्मणुनी कां कण्हावें कुंथावें दिनभरी ?
घरचा ज्योतिषी झाला ह्मणुनी कां प्रश्न विचारावे दिनभरी ?
घरचा गवई झाला म्हणुनी कां त्यास गाववावें दिनभरी ?
घरचा कवीही झाला म्हणुनी कां काव्य वदवावें दिनभरी ?

१४६

दाराचा मयूर आला दाराकडे मारोनी का खडे उडवावा ?
पंजरस्थ झाला शुक मधुवक्ता काय येतां जातां दुखवावा ?
दारापुढचा हो ! झाला जरी पिक बोलोनी का 'काक' हिणवावा ?
दाराचा कवीही जाहला म्हणून काय त्याचा मान विसरावा ?

१४७

गांवाजवळोनी वाहतो ओहोळ पावे गंगाजल उपमेला
हिमाचल भाग्य लाभे टेकडीला विषय जहाला वर्णनाला
पाहियेलें नाहीं वाराणसी क्षेत्र महिमा तो मात्र येथें आला
आत्मीयता जेथें स्तुति वाढविते मोल तेथें येतें भावनेला

१४८

काल डावा डोळा फार फडकला आज उजव्याला चाळा लागे !
काल डावा हात फार खाजवला आज उजव्याला खाज लागे !
काल घुबडाचें दर्शन जहालें आज तास बोले सत्य मागें !
स्वार्थ-भोळे लोक अंध विश्वासाचे सुखदुःख त्याचें रोज जागे !

१४९

अग्निमुखामाजीं सोन्याची परीक्षा हिऱ्याची परीक्षा घणाखालीं !
तीक्ष्णमुखावरी बाणाची परीक्षा खड्गाची परीक्षा धारेखालीं !
तीव्रगतिवरी अश्वाची परीक्षा गजाची परीक्षा गडस्थळीं
महासभास्थानीं विद्वान परीक्षा शूराची परीक्षा युद्धस्थळीं !

१५० ३८५.

सलिलावांचोनी पद्म तें शोभेना सलिल शोभेना पद्माविना
रजनीवांचोनी चंद्र तो शोभेना रजनी शोभेना चंद्राविना
कंकणावांचोनी हस्त तो शोभेना कंकण शोभेना हस्ताविना
तैसा भूपावीण कवि तो शोभेना भूपहि शोभेना कविविना

१५१

कुसुमाची शोभा देवाच्या मस्तकीं तीर्थाच्या तटाकीं साधु-शोभा
कळसाची शोभा देउळावरतीं युद्धभूवरतीं ध्वज-शोभा
सुभगेच्या भाळीं शोभा कुंकवाची तैशी कंकणाची करामाजी
गजराज-पृष्ठीं अंबारीची शोभा कवितेची शोभा सभेमाजी

१५२

देवावांचुनीया देऊळ तें सुनें सदन हो सुनें पुत्रावीण
हीरकावांचून मुद्रिका ती सुनी आकाश-श्री सुनी चंद्रावीण
हारावीण कंठ कंठावीण गान सुनें भासे गान वाद्यावीण
सौंदर्यावांचून रसिकता सुनी सुंदरी ती सुनी पतीवीण

१५३

नीतीवीण राजा विराजत नाहीं राजनीती तीही धर्मावीण
स्वकीर्तीवांचून कुलज न शोभे कुलजा न शोभे लज्जाहीन
संग्रामसिंहाचे हात शस्त्रावीण चतुरंग-सेना गजावीण
ऐश्वर्य न शोभे दानधर्मावीण कविता न शोभे मानावीण

१५४

शूराच्या करात खड्ग शोभे जैसें म्यानात न तैसें शोभतसे
युद्धीं खड्गधारी शोभे शूर जैसा सदनीं न तैसा शोभतसे
शूरासह अश्व शोभे समरांत अश्वशाळेंत न तैसा शोभे
पतिसह शोभे सुंदरी सासरीं तैशी न माहेरीं तीही शोभे

१५५

बोलू नये कटु सत्य तें बोललों   मग धैर्य काय सोडावें तें
दिव्य भावनेंत दिव्य आचरीलें   मग काय भय मानावें तें
वर्तमान काळ स्वार्थ-संबंधाचा   भावी काळ सेवी सत्यत्वातें
सत्यधर्म जरी सेवायाचा तरी   जगताचें सारीं दूर नातें

१५६

केवळ सलिल प्राशोनिया राहू   तव नच सेवू पक्कान्नातें
फाटकी धोंगडी पांघरोनी राहू   तव नच सेवू सद्वस्त्रातें
जुन्या झोंपडीत आनंदानें राहू   तव नच सेवू प्रासादातें
शारदेचे भक्त शारदोद्यानांत   तुच्छ लेखितात वैभवातें

१५७

तुमचीं श्रीमंती असो तुम्हापाशीं   थोरवी आम्हाशीं दावू नका?
तुमचें वैभव असो तुम्हांपाशीं   अहंता आम्हाशीं दावूं नका?
विद्या अधिकार जरीही असेल   अभिमानी बोल बोलूं नका?
सौहार्दाचा गुण ज्याच्या हृदयांत   अमुचा तो सत्य जीवसखा!

१५८

गुणवान जे जे प्रशंसक त्यांचे   आही गुणज्ञांचे आभारी हो!
पावित्र्याचे आहों भाविक भजक   सौंदर्य-शोधक आम्ही आहों!
प्रेमळ हृदयी रसिक जनांचे   स्नेही आहों साचे प्रेममय!
चारित्र्यानें हीन उन्मत्तची भारी   आम्ही त्यांचे वैरी निःसंशय!

१५९

विद्वत्तेचा झाला ज्यास अभिमान   बरे त्याच्याहून अविद्वान
वेदांताचे भाट झाले गर्ववान   बरे त्यांच्याहून वेदहीन
लोकमान्यतेनें गेले जे चढून   बरे त्याच्याहून कीर्तीहीन
निर्मळ प्रेमळ जळ निर्झरांत   महासागरात तें लवण

१६०

स्वातंत्र्य म्हणजे नोहे उद्धर्तन स्वातंत्र्य ह्मणजे संयमन
श्रेष्ठत्व ह्मणजे नोहे अभिमान श्रेष्ठत्व ह्मणजे समाधान
विद्वत्व ह्मणजे नोहे वाचालता विद्वत्व ह्मणजे शांतिस्थान
तत्व ओळखावें अंतरीं बाणावें जीवित करावें लोकमान्य

१६१

चदनास काय स्वगंधोपयोग त्याचा उपयोग जगताला
हरिणास काय कस्तुरीचा वास तियेचा संतोष जगताला
वृक्षालागीं काय पुष्पफलोत्पत्ती त्यांची उपभुक्ति जगताला
निःस्वार्थी जे लोक त्यांचें दृढव्रत करी उपकृत जगताला

१६२

वेताळाच्या स्कंधीं बैसोनी का कोणी नाम प्रसिद्धीला पावतसे?
जांबुवताच्या का मुखाग्रीं बैसोनी गौरवार्ह कोणी तो होतसे?
भस्मासुराच्या कां कोणी तळहातीं बैसोनिया कीर्ती पावतसे?
आपुलेंचि तप आपुलेंचि पुण्य लौकिकास मान्य करीतसे.

१६३

राख लावोनीया धन मेळवीती तरी लोक साधू ह्मणवीती
निंदा द्वेष यानीं अंतर भरलें तरी लोक संत ह्मणवीती
गृहपुत्रदारा चालला संसार वेदांती तरीही ह्मणवीतीं
बैसोनी एकांतीं तप आचरीती त्यांची मात्र कीर्ती लोक गातीं

१६४

काय ती कविता काय ती वनिता रसज्ञांच्या चित्ता जी मोहीना
काय ती विद्वत्ता काय ती वाटिका मानसिक दुःखा जी हारीना
काय ती गुरुता काय ती सरिता लागलेली तृषा जी वारीना
काय तें जीवित काय तें कर्तृत्व कुल कीर्तीवत जें करींना'

१६५

हिंसकाला सांगा कितीही पापाच्या  कथा त्या हत्येच्या फळ काय ?
वेश्येलागी सांगा सजवोनी ओष्टीं  पातिव्रत्य गोष्टी फळ काय ?
नास्तिकाला सांगा जगन्नायकाच्या  लीला कौतुकाच्या फळ काय ?
स्वभावाचें मूळ बिषारीच जेथें  बोधजल तेथें करी काय ?

१६६

नेत्रविकृतीचा पारखी मिळाला  कोठवरी रत्नें दाखवावीं ?
पिनस रोगाचा पारखी मिळाला  कोठवरी तैलें हुंगवावीं ?
अरसिक श्रोता मिळाला तयाला  कोठवरी काव्यें ऐकवावीं ?
मर्मज्ञाविहीन इतराशीं गांठ  पडतांच पाठ वळवावी !

१६७

वेश्येस सांपडे अनाथ कुमारी  ममतेचा भारी पूर वाही
कसायास गाय सांपडे अनाथ  दयामय चित्त त्याचें होई
वटोत्कची माया वरूनी दाविती  अतीं दुष्ट होती तापदाई
भूतदया आणि परोपकाराचे  मार्ग अधमांचें पाप–डोहीं

१६८

सुविचार नाहीं जाराच्या मनांत  गणिका चित्तांत लाज नाहीं
दानबुद्धी नाहीं कृपणाच्या मनीं  अधम वचनीं सत्य नाहीं
विश्वास तो नाहीं लंपट-मानसीं  मद्यपी जनासी शुद्धि नाहीं
समभाव नाहीं गर्विष्ठाच्या ठायीं  कोपिष्ठाच्या देहीं शांती नाहीं

१६९

धिक तो नरेश ज्यास देश नाहीं  धर्मरुची नाहीं देश धिक
रुचि धिक असो सत्याच्या वांचून  विवेकावाचून सत्य धिक
समयावांचून धिक तो विवेक  समय तो धिक भक्तीविण
सलग्नतेवीण भक्ति असो धिक  सलग्नता धिक जी कामुक

१७०

अग्नि, जल, राजा कोपतील केव्हां यासीं प्रीती ठेव थोडी थोडी
वैद्य, अधिकारी याच्या सगमांत थोड्या बोलण्यांत फार गोडी
जारकर्माचारी तैसाची जुगारी यासीं घालूं नको पैज होडी
अंतरींचें ज्ञान जागृत ठेवून व्यवहार—ज्ञान त्यास जोडी

१७१

एक मधुबिंदु क्षारसमुद्राची घालवी विरुची तरी कैसा ?
एक जलबिंदु दीप्त दावानल प्रशांत करील तरी कैसा ?
एक नभस्तारा गाढ अंधाराला निरवावयाला शक्त कैसा ?
एक बोधशब्द तीव्र अज्ञानाला ! घालवावयाला शक्त कैसा ?

१७२

उष्णकाळा माजी छाया पांथिकास तैसे दुःखितास संत-बोल
बुभुक्षु जनास पक्वान्नाचे ग्रास तैसे मुमुक्षूस साधु-बोल
स्वाति नक्षत्राचे बिंदु चातकास तैसे कामुकास प्रीती-बोल
पयोधर—ध्वनी जैसा मयुरास प्रेमतृषितास स्नेह-बोल

१७३

उंटाचें तें काय सरळ हो साच वक्र अवघाच देह त्याचा !
अस्वलाचें रूप कोणतें निर्मळ साराच केसाळ देह त्याचा !
गाढवाचें गात्र कोणतें पवित्र सारा अपवित्र देह त्याचा !
कोणता सुगुण नीच दुर्जनांत पुतळाच मूर्त दुर्गुणाचा !

१७४

आम्राच्या छायेंत स्तवियेला आम्र प्रशंसिला निंब निंबाखालीं !
समुद्राच्या तीरीं समुद्र वर्णिला नदीतीरीं तिला वाखाणिली !
केतकी वर्णिली पुष्प वाटिकेंत निर्गुंडी वनांत प्रशंसिली !
कार्यसाधु जे जे अभिप्रायें त्यांच्या निर्णयाची इच्छा कोणीं केली ?

१७५

आंधळा दावितो मार्ग आंधळ्याला उद्धरी पांगळा पांगळ्यांशीं
मूकाचें वक्तृत्व मूकाशीं संपूर्ण बधिराचें गान बधिराशीं
धर्मभ्रष्ट करी भ्रष्टास सद्बोध पापी करी शुद्ध पापियाशीं
कोणी हे लावावे सन्मार्गास जीव गुरु अनुभव त्यांचा त्यांशीं

१७६

कैसा समुद्राचा काढावा हो गाळ कैसा जन्मखल निर्मळावा ?
कैसा कालियाचा सोडवावा फासा दुराचारी कैसा निरवावा ?
कैसें पचवावें तीव्र हालाहल कैसा खलबोल पचवावा ?
निर्जन वनांत निघोनी कीं जावें तुज आळवावें वाटे देवा !

१७७

मगर सुसर बरवा तत्स्नेह स्वार्थ—लोलुपांचा स्नेह नको
सिंह व्याघ्र पशु बरवी तन्मैत्री विश्वास घातकी मैत्री नको
वृश्चिक भुजग बरवा तत्संग मर्मभेदकांचा संग नको
समुद्राच्या तीरीं राहावें कांतरीं देवा यांचें परी मुख नको

१७८

दुःखें जों गांजला विद्वच्चूडामणी मूर्ख होय ज्ञानी बोधायाला
दैवें जों पिडीला शूर रणधीर पुढें ये अधीर वंचायाला
भोग पुढें आला सुनीतीमंताला संधी तीच खलां हंसायाला
पडत्या काळांत पतिताचे फार करितात वार काळजाला

१७९

आश्विनांत गंधें भरील दिशांला पारिजातकाला तोडूं नका ?
चैत्र वैशाखांत लोंबतील घोंस द्राक्ष लतिकेस मोडूं नका ?
काळमानें झाला उदास विद्वान त्याचें मर्मस्थान छेदूं नका ?
तो तर कीर्तीनें अभंग राहील तुम्ही पात्र व्हाल दुर्लौकिका.

१८०

केतकीभोंवती मधुपाचा नाद ऐकोनिया नाग उफाळला
फुत्कार सोडितो फणा आपटीतो गरळ ओकीतो केतकीला
त्रासला गळाला आला भूतळाला गरुडानें नेला गगनाला
विधि-संयोगात विघ्नक होतात नीच पावतात शासनाला

१८१

बाजेचा माचवा ढेकणाचा गड वारुळ हा गड भुजंगाचा
मातीचें ढेकुळ विंचवाचा गड मस्तक हा गड कीं ऊवांचा
नदीची दरड खेकडाचा गड गेहछिद्र गड मूषकांचा
हीनाचारी त्यांचा देह-संनिवास रुचिर स्थानास ना व्हायाचा

१८२

चंदनाशेजारीं निंब तो लाविला शेवटीं निंबोळ्या आल्या त्यास
आम्राच्या शेजारीं बाभूळ लाविली शेवटीं ती ल्याली-कंटकास
कदंबाशेजारीं धोतरा लाविला शेवटीं तो ल्याला विषत्वास
सज्जनाशेजारीं नीच राहोनीही सोडिती न काहीं स्वधर्मास

१८३

नागीण राहते वारुळांत जेथें सदन हो! तेथें बांधूं नका?
कुटीण राहते जवळ शेजारीं ऐशा त्या अगारीं राहू नका ?
विष-औषधाच्या पुड्या एकाठायीं कधीं चुकुनीही ठेवू नका?
हिरवा हिरवा संसाराचा बाग लागेल हो ! आग चुकू नका?

१८४

गिधाडांचा मेळा नाचे संतोषून कोकीळ चुकून तेथें गेला
आग्रह तयाला गायनाचा झाला पंचमाचा गळा ऐकवीला
"ही ही ही" करोनी मासखंड हेती अवमानिताती मूर्ख त्याला
मूर्खांच्या सभेंत गेलाही चुकून काय पावे सूज्ञ-सन्मानाला ?

१८५

समुद्राच्या पोटीं रत्नें निपजतीं    शंखही जन्मती त्याच्या पोटीं
आकाशाच्या पोटीं सूर्यचंद्र पाही    धूमकेतू तेही त्याच्या पोटीं
मानसाच्या तीरीं हंस जन्म घेती    बेडुकही किती उपजती
एकस्थानीं जन्म एकस्थानीं वास    ज्याचे गुण त्यास निवडीती

१८६

शंकराच्या कंठीं वास भुजंगाचा    विषधर्म त्याचा तो सोडीना
विष्णुहस्तीं ठाव लाधेही शंखाला    अंतर्वक्रतेला तो सोडीना
स्वर्गाच्या देवानीं यत्नें जो मंथीला    अब्धि क्षारत्वाला तो सोडीना
मूळचे दुर्गुणी त्यांच्या दुर्गुणास    निरवावयास शक्ती कोणा ?

१८७

ओळख नसतां स्तुती जो करितो    जाणावा ठक तो कार्यसाधू
घरीं येऊनीया सांगतो हितास    ओळखावा त्यास दुष्ट भोंदू
बोलतां बोलतां सोडितो स्वभाव    सोडावा तत्स्नेह विषस्वादू
विपरीत चिन्हें ज्याचीं साक्ष देतीं    त्याची अंतर्वृत्ति नये शोधूं

१८८

क्षणोक्षणीं कांटे बोंचतात फार    टाळावा विहार ऐशा रानीं
जेव्हां तेव्हां हिंस्र पशू ओरडती    सेवू नये शांती त्या काननीं
जेव्हां तेव्हां उग्र पेटे ज्वालामुखी    मानू नये सुखी तेथें कोणी
वारंवार जेथें मनस्ताप होई    दूरदूर राही त्यापासोनी

१८९

राक्षसाशीं आव ब्रह्मराक्षसाचा    तेव्हांच तयाचा त्रास मिटे
भूतासंगें व्हावें महाभूत जेव्हां    छलकाचा तेव्हां छळ मिटे
रुद्रासह व्हावें महारुद्र जेव्हां    उग्रतेचा तेव्हां कांटा तुटे
त्याची डुरकणी आपुली गर्जना    कैसा त्याच्याविना घोर सुटे ?

१९०

जेथें मंडुकांचें घोष करी सैन्य पल्वलांचें स्थान जाणावें तें
जेथें गृध्र-सेना नाचे संतोषून पशूचें स्मशान-जाणावें तें
जेथें लंबकर्ण करितात गान कुंभाराचें स्थान जाणावें तें
पामर नादती जेथें आनंदात जाणतात संत कुग्रामातें

१९१

बायकांत केल्या पौरुषाच्या गोष्टी षंढ अश्वपृष्ठीं आरूढला
युद्धाचा गजर झाला एकवार घोडा पाणीदार उसळला
सुटे तेव्हां ढाल गळे तलवार वरचा तो स्वार खालीं आला
शूरत्वाच्या गोष्टी शोभती शूराला आणि इतराला व्यर्थ चाळा

१९२

गाढवांचा धनी अश्वीं चढविला सेनापति केला कुंभाराला
चढली जों स्वारी वर चार बोटें स्वर्ग चार बोटें राहे त्याला
खरांची घोषणा ज्याच्या नित्य कानीं त्यानें रणध्वनि आयकिला
सेनेच्या आधींच सेनानी पळाला योजक नृपाला खेद झाला

१९३

पावसाच्या येती सरीवर सरी खालीं आणि वरी पाणी पाणी
नभ गडगडे वीज कडकडे लपतातीं झाडें रानोरानीं
तेव्हां माकडास गेह बांधण्याची बुद्धि होई साची प्रतिक्षणीं
गेला पावसाळा आला जों हिवाळा स्वच्छंदी तो गेला विसरोनी

१९४

गळ्याची सांखळी सुटे हातांतली माकडानें केली चपळाई
वृक्षाची जी शाखा शाखेचे जे गुच्छ गुच्छांत सपुच्छ उडी घेई
तेथें धडपड व्यर्थ चालविली साखळी डहाळी एक झाली
सांपडला हातीं तेव्हां दु:ख किती देह आणि माती एक झाली !

१९५

क्षुधा शांत झाली तृषा शांत झाली भाकडांनीं केली नवलाई
रामायण-काळ आठवला त्यातें जागा खेळायातें आमराई
'राम' होई एक 'लक्ष्मण' एक 'हनुमंत' एक भक्त होई
परी 'दशानन' होई एकही न झालें घोर रण त्याच ठायीं

१९६

तेलियास झाला नवसानें बाळ घाण्याचा तो बैल रडूं लागे !
कुंभारास झाला नवसानें लेक गाढवच एक रडूं लागे !
वृषभगर्दभ भेटले काननीं ज्याची तो कहाणी सांगूं लागे
एक ह्मणे आतां घाणा नित्यमानी दुजा ह्मणे गोणी पाठी लागे !

१९७

परमार्थ—ज्ञानी साधु आला एक धावताती लोक दर्शनाशीं
आपुलें माहात्म्य सांगे तो मुखानें पूज्य होई तेणें भाविकांशीं
दोन चार काहीं दावी चमत्कार लोक-नमस्कार तत्पादाशीं
आरभीं आरभीं जे जे झाले चेले अनुतापी झाले ते मानसीं

१९८

कोकिळ ह्मणोनी विहग पाळिला कावळा निघाला शेवटीं तो !
हीरक ह्मणोनी गांठीस बांधिला काचच ठरला शेवटीं तो !
साधु समजोनी आश्रय दिधला भोंदूच निघाला शेवटीं तो !
वरच्या रूपाला भुलतात जीव मग अनुभव गुरु होतो.

१९९

दोघे ढोंगी एका देउळीं राहिले दोघानीं झाकिलें नेत्र दोन्ही
एक दुसऱ्याला चोरूनिया पाही ढोंगी लबाडही ठरे जनीं
त्याच्यापुढें कोणी ठेविना प्रसाद दुज्याचा प्रसाद घे हिरोनी
तोंच उतरली त्याचीही समाधी जाहली उपाधी देवस्थानीं

२००

दोन तस्करांनीं पाचेच्या रत्नाची माळ धनिकाची चोरियेली
अर्धी अर्धी माळ घेईनाच कोणी रानात मुर्खांनीं झोंबी केली
वृक्षीं होता मोर माळेस पहात सर्प-संभ्रमात त्यानें नेली
"चोरावर मोर!" म्हण लौकिकाची येथें मात्र साची झाली झाली

२०१

सुधारक स्नेही प्रवासी जहाले प्रयागास गेले गंगातीरीं,
त्यांचा थाटमाट पाहोनी न्हाव्याला मोद बहु झाला निजांतरीं,
क्षौराचें वेतन मिळेल बहुत बापुडा मनांत आशा धरी,
तोंच त्यांनीं हातें क्षौर आरंभीलें न्हाव्यानें पाहीलें डोळे भरी !

२०२

चोरी करोनिया चोर तो पळाला मात्र सन्याशाला शिक्षा झाली !
जारिणीचा जार पळोनिया गेला पांथस्थ विप्राला शिक्षा झाली !
शेजाऱ्याच्या गेहीं वैरी आग लावी साधु-गेहाचीही राख झाली !
संचितानुभव अघटित होतो साहजिक जातो हात भाळीं !

२०३

जेथें हंस खाई कमळाचा चारा बक एरझारा घालिताती
जेथें गरुडानें मारिल्या भराऱ्या वाघुळें तीं फेऱ्या घालिताती
जेथें पंचानन गर्जे भव्य नादें जंबुक दुःशब्दें ओरडती
जेथें मानसिंह मानकीर्ति जोडे तेथें श्वान हाडें चघळती

२०४

अधिकृतवर्गी विनयाचा अर्थ भिरुता हा सत्य ठरलेला
सत्यनिवेदन धृष्टता मानिती सेवा समजती आतिथ्याला
गुणज्ञता मुकी रसज्ञता मुकी वागविती मुखीं दर्पोक्तीला
उन्मत्ताचा सध चढला पडला बोध तो जाहला जगताला

२०५

लंकेचा रावण मातींत मिळाला वश न राहिला महीवरीं !
बलीसम राजा पाताळांत गेला त्यास का पाहिला कोणी तरी ?
कर्णासम गेले धर्मासम गेले कोणी न राहिले मृत्युलोकीं,
बरी वा वाईट कीर्ती मात्र त्यांची राहिली हो साची सर्वलोकीं !

२०६

वनचरा हातीं हिरा सांपडला विभ्रमें तो त्याला काच मानी
काचमणिमाला घालितसे गळा ऐशा फकिराला दे आणोनी
मागोनि कळालें भाग्यहीन नरा गेला गेला हीरा हातांतुनी
दारिद्र्याचा ताप त्यांत अनुताप करितो विलाप अल्पज्ञानी

२०७

मदिरेचा धनी त्यानें जाहिरात दिली जगतांत अमृताची
ताडवन-स्वामी त्यानें जाहिरात दिली जगतांत गोरसाची
माळ्याचा राजा त्यानें जाहिरात दिली जगतांत कस्तुरीची
इतुके जगाला मूर्ख समजती उपहास कीर्ती हीच त्यांची

२०८

ज्याच्या तोंडीं येई मदिरेचा वास काय तो लोकांस सुधा देई ?
ज्याच्या आचारांत बाभळीचे फांस हार रसिकास कैसा देई ?
ज्याच्या द्वारीं मत्त डुलती महिष लोकीं तो पायस कैसा देई !
नित्य जो विवादी उग्रसेन भासे काव्यमधु कैसें लोकां देई ?

२०९

अनुभव आला ज्ञाता तूच झाला निश्चय त्वा केला अंतरींचा
नको बोलूं बापा ? मनाचा संकल्प शिणवी न अल्प दृढ वाचा
वाहिली शपथ तुझी तुज ठावी देव साक्षी ठेवी आचाराचा
कृती आचरून घेई बदलून मुखीं शब्द 'धन्य' लौकिकाचा

२१०

आपुलेंच नाहीं स्वच्छ घरदार परक्यांचा केर कां काढावा
आपुलीच नाहीं प्रेममय वाचा शिव्या परक्यांच्या कां मोजाव्या
आपुल्याच नाहीं शोधिलें चित्तास बोल परक्यास कां लावावा
अंतर्दृष्टी आधीं तुझी तूंच कर तुवां पर–भार कां वाहावा

२११

धोबी क्षाळितसे परक्यांचा मळ अंतरींचा मळ क्षाळीचना !
सोनार उडवी पावकाची रक्षा अंतरींची रक्षा उडवीना !
झारेकरी शोधी मातींतुनी सोनें अंतरींचें सोनें शोधीचना !
जो तो दावितसे परक्याचा दोष परी निज–दोष ओळखीना !

२१२

अनाठाया जरी दाविला विनय तिथें अहंकार पीडा देई
अस्थानीं जरीही लवविलें शिर तिथें अधिकार त्रास देई
भलत्याच ठायीं केला उपकार तिथें दुराचार खेद देई
आधीं सारासार करावा विचार मग जें होणार होवो कांहीं

२१३

हातीं घेतां माती होत होतें सोनें मातीमोल जीणें आज होय
हातीं घेतां धोंडा होत होता देव धोंड्यापरी दैव आज होय
उलटला काळ उलटले दिन न काढी वचन 'हायहाय'
भोग देवांनाही चुकलेले नाहीं स्वस्थ राही पाही नवलाई

२१४

वेळ पहा आली, शूर बळभीम बल्लवाचें काम करितसे !
हरिश्चंद्र राजा डोंब्याच्या सदनीं घटानें हो पाणी भरीतसे !
श्रीकृष्णाचा स्नेही पार्थ वीराग्रणी तपस्वी होवोनी हिंडतसे !
दुर्दैवाचे फांसे मोठ्या मोठ्यांनाही चुकलेले नाहीं पहा ऐसे !

२१५

खाटिकाचे गेहीं चघळूनी हाड भुंकतसे श्वान–अगावरी
अकारण राग अकरुण भाषा दावितो तमाशा–दुराचारी
काय त्याच्या नादीं-लागोनीया कोणा कीर्तिलाभ झाला-लोकांतरीं
करंट्यांचीं विघ्नें-आडवीं न येतीं कर्तृत्ववानांच्या-कार्यांतरीं

२१६

पारध्याचें लक्ष्य-कस्तुरी मृगाशीं धरी तो हाताशीं श्वानालागीं
जाळें लावोनीया-वेळ पाहोनीया खूण करोनीया सोडी वेगीं
शिकारीची मौज सतोषे[१] पाहोनी कृष्णकारस्थानी वाममार्गी
सज्जनाचे वैरी संभावित नीच त्यांचा मार्ग हाच पापोद्योगी

२१७

कुंभाराचा खर भुकतो कशाला कारण तयाला पुसू नका
मदारीवाल्याचा घुमतो कां रीस कारण तयास पुसू नका
फेरिस्त्याचा उंट हालवी कां ओठ कारणाची गोष्ट पुसू नका
जगाच्या मूर्खांचा जन्माचा जो दोष करोनी सायास जातो तो कां?

२१८

आम्रवृक्षावरीं बांडगुळ वाढे काय आम्रफळें येतीं त्यास?
भुजगम वाढे मलयाद्रिदेहीं काय त्यास येई गंधोल्हास?
सिंहद्वारीं होई श्वान देहपुष्ट काय पावे त्याच्या योग्यतेस?
जरी नीच वाढे गेहीं कुलीनांच्या काय पावे त्यांच्या सद्गुणास?

२१९

सिंहाचिया स्थानीं बैसविला कोल्हा कोल्होबाही झाला मृगराज,
आली वेळ तेव्हां करी कोल्हेकुई अंतरीं न वाही लोकलाज
रत्नाचिया स्थानीं बैसविली गार काय दावणार आत्मतेज
दोष नाहीं तीचा आहे योजकांचा पश्चात्ताप त्यांचा त्यास रोज

---

१ आनंदित होई

२२०

डाळिंबाच्या मोहे शुक कौठावरीं   चंचुघात करी एकाएकी
अडकोनी चोंच निघेना फिरोनी   कळकळ वाणी करी शोकीं
यत्नाचा शेवट देहत्रास होई   सुटे ळवलाही पची पक्षी
रसिकांचा योग कठिणाशीं आला   देहसकटाला पावे लोकीं !

२२१

मत्सराच्या पक्षीं आसन घालून   सागर तरून गेला कोण?
मंडुकाच्या पृष्ठीं स्वारी चढवून   हिमाद्रि लघून गेला कोण?
माकडाचें पुच्छ दृढ आवळून   मेघमंडळाला गेला कोण?
शद्व-घोषकारी पामरा सेवून   सांगा कीर्तिमान झाला कोण?

२२२

धेनुस्तनीं राहे गोचिडांचा मेळा   सोडोनी दुग्धाला रक्त शोषी
मानसाच्या तीरीं भेक पंकजाला   सोडोनी, पंकाला सेविताती
उद्यानीं कीटक पुष्पसौगंधास   सोडोनी देंठास भक्षिताती
रसिकांचा रस अभाग्याच्या कांहीं   लिहिलाच नाहीं भाळप्रांतीं

२२३

सर्पस्नेह केला-फळ सांगायाला   ज्योतिषी कशाला—पाहिजे हो?
नक्रसग केला-गति सांगायाला   दैवज्ञ कां त्याला-पाहिजे हो?
विषारी वल्लीचा-कथाया अपाय   धन्वंतरी काय-पाहिजे हो?
ओळखोनी लोक-दुष्ट हृदयाचे   कोणीही न त्यांचें-तोंड पाहो!

२२४

काजळाच्या गेहीं-कितीही सांभाळा   एकतरी डाग-लागायाचा
कंटकांच्या रानीं-पाहोनीही चाला   एकतरी कांटा-बोचायाचा
कीटकांच्या स्थानीं-हळु पाय ठेवा   एकतरी दुष्ट चावायाचा
कुग्रामात वास-कुजनांचा योग   एकतरी भोग-तो यायाचा

२२५

निंबाचिया काष्ठा–लेप चंदनाचा विके चंदनाच्या–मोलानें तें
देहें झिजण्याची--लोकीं वेळ येई कटु वास येई–तेव्हां त्यातें
नीचकुलोत्पन्न–सज्जनांचें रूप दावीत अमूप--सामान्यांतें
लोकहितकार्यीं-कष्ट सोसण्याची परीक्षा तयांची-होई तेथें

२२६

तुफानांत नौका हाय सांपडली खिळ खिळी झाली जागोजागीं
पडल्या हो फटी शिरें आंत पाणी जाईल ती क्षणीं अधोभागीं
करावा उपाय पाणी उपसावें तरणीस न्यावें तीरालागीं
परी ऐशावेळीं भांडती प्रवाशी ह्मणावें तयासी हतभागी

२२७

भुजंग सच्छील सदय शार्दूल पावक शीतल पाहिला कां ?
वायस गर्दभ दोघाचें चरित्र कोणीही पवित्र ऐकिलें कां ?
षंढ रणधीर, वेश्या पतिव्रता ऐशा कोणी कथा ऐकिल्या कां?
तेजानें उज्वल अवसीची रात्र वांझेचा सुपुत्र पाहिला कां ?

२२८

घरास लागली आग भयंकर आंत भांडखोर भांडताती !
समान हक्काचे आधीं सारें होऊं आग ही विझवूं बोलताती !
भलत्या प्रसंगीं भलताच नाद धरोनी विवाद माजविती ?
नांदत्या घराची केली राख-माती बैरागी ते अंतीं हिंडताती ?

२२९

गांवाच्या मर्दीत पंचाईत चाले वेशीवर आले चोर जरी !
लुटला हो गांव सफाई लुटला कल्लोल माजला लोकांतरीं !
जातीचीं भांडणें शिष्ट भांडताती कोठोनी दुर्मती आली तरी ?
पक्षद्वेषें कांहीं चोरांत मिळाले बंधुद्रोही झाले हरी ! हरी !

२३०

कडु कारल्याचीं-शेतें पिकवोनी  धनी झाला कोणी ऐकिलें का ?
काष्ठाच्या खड्गानें-शत्रूस जिंकोनी  शूर झाला कोणी एकिलें का ?
कोणीं एरंडाचें-गुऱ्हाळ लाविलें  वित्त मिळविलें-ऐकिलें का ?
उन्मत्ताचे वाडे-नित्य ऐश्वर्यात  नांदले जगांत पाहिलें का ?

२३१

तृषा भागविली मोतियाचें पाणी  प्राशोनिया कोणी सांगा तरी ?
तृषा भागविली तरवारीचें पाणी  प्राशोनिया कोणी सांगा तरी ?
काव्य-रस कोण बुभुक्षित प्याला  संतुष्ट जहाला सांगा तरी ?
हृदयाचे धर्म हृदयास ठावे  जडांना दावावें कैसे तरी ?

२३२

अमृतासमान--नीर वर्षताती  मेघ ना याचिती--नमस्कार
नित्य मलीनांचा मळ क्षाळिताती  नद्या ना वांछिती—नमस्कार
वृक्ष फल--पुष्पें छाया अर्पिताती  कुणा ना मागती--नमस्कार
नाहीं भूतदया नाहीं उपकृती  उन्मत्त वांछिती—नमस्कार !

२३३

एका उद्यानांत--एक पुष्करिणी  एकच सुवर्णी--पद्म तेथें
नित्य विकसावें--सौंदर्ये हंसावें  वायूनें डोलावें त्यानें तेथें
तीरावर कोळी--नाना उपायांत  झाला बहु त्रस्त--लाधेना तें
शेवटीं मुर्खानें-पाषाण फेंकिले  छिन्नभिन्न केलें त्या पद्मातें

२३४

आपुल्याच हातें मारिती दगड  करिती ओरड चोर ! चोर !
शेजारी गरीब भीती दुष्कर्मासी  माजविती त्यांशीं व्यर्थ वैर !
शिव्यांची लाखोली मार्गांत वाहती  घरांत हसती पापी थोर !
स्वनाशाच्या आधीं दुष्ट मत्त होती  ऐसें बोलताती ज्ञानेश्वर !

२३५

कीटकांचा जेथ-समूह मातला भ्रमर पुष्पाला-सोडिताती
मडूकांचा जेथ-कल्लोळ माजला हस पल्वलाला सोडिताती
वायसांचा जेथ-कल्लोळ जाहला पिक त्या आम्राला सोडिताती
मूढवृद जेथें-प्रमत्त जहाला कवि भूपाला—सोडिताती

२३६

अल्पगुणी मागे बहुगुणमान न तरी तो श्वान भुंकू लागे
आपुल्या दोषांची मालिका गुंफून दुजाच्या कठांत घालू लागे
अपशब्दारभ प्रारंभींच जेथें सूज्ञ पाय तेथें घेती मागें
ऐसा पशू जरी यत्नें शातविला तरी का स्नेहाला मन लागे ?

२३७

औदार्य वात्सल्य हृदयांत नाहीं थोरवीचा वाही अभिमान
मुखीं प्रेमभाव लोभिष्ठाचा फुका दूधासाठीं बोका टपलेला
परापहाराची सधी सांपडतां पुराणाच्या कथा पुराणात
करायाचा काय असला स्वजन टाकी नि सारून ससारात

२३८

आपुलेंच नाक आपण कापून करितो दुश्चिन्ह परक्यास
आपुली दुष्कीर्ती आपण सांगतो जगीं लाजवितो स्वजनास
औदुंबर-फळ हातानें फोडावें कृमि उडवावे कासयास
चिखल करावा, पाणी ढवळावें त्याहून सेवावें शांततेस

२३९

अधिकारी लोक दिसती ताठ्यांत तैसे धनवत अभिमानी
बुद्धिमत तेही मत्सरीं बुडाले विवादी जहाले कवि जनीं
कोणापाशीं जावें मन रिझवाया चित्तास कराया समाधानी
सतसाधुसग किंवा प्रभूनाम नसो मनःकाम या वांचोनी

२४०

तुझ्या आणि माझ्या हृदयांत रेषा उमटून भाषा--स्पष्ट झाली
जीविताचे मार्ग भिन्न भिन्न झाले दोन ओघ झाले एका जलीं
अभिन्न हृदयीं एक जीवभाव परी प्रीति–नाव--ही बुडाली
ज्याचा पंथ त्यानें आक्रमावा आतां बुझवावें चित्ता-सर्वकाळीं

२४१

प्रेमाची ती कथा सांगण्याची नाहीं करा बोध कांहीं ऐके कोण ?
मनाच्या रोगाला कोणी ओळखीना आपुली आपणा झुरणी ती !
स्वतां प्रेमी झाल्यावीण विरहाचा अनुभव कैचा कोणा येई ?
आपुल्या पायास नारू होतो जेव्हां दुसऱ्याचें तेव्हां दु:ख कळे !

२४२

भविष्याचा केला अनुकूल अर्थ अधर्मच व्यर्थ आचरीला
पोटच्या मायेला लावियेली आग कर्माचा दुर्भोग नोळखीला
किती दाखविला सद्बोधाचा वीट आपुलाच हट्ट चालविला
टळायाचें नाहीं कर्मफळ घोर जरी अश्रुपूर वाहवीला

२४३

पराच्या पखाशीं पख जुळवून मज आवडे न नभःक्रीडा
इतरांच्या संगें धावून धावून रुचे मजला न वनक्रीडा
आपुल्या छंदांत आपुल्या नादात आपुल्या तालांत जीव वेडा
निंदा आणि स्तुति आयकू येईना स्वातंत्र्याचा लागे मनीं ओढा

२४४

तुझ्या पासुनीया लाभ वा ! नव्हता लोभ मात्र होता तुझ्यावरी
इच्छाच नव्हती मिळो धनधान्य प्रेमाचें निधान तू शेजारी
अकस्मात गेला पाखरा ! उडून जिव्हाळा ठावून मदंतरीं
वैभवाच्या वृक्षीं घेशील विसावा पाहीन मी केव्हां केव्हां तरी

२४५

कुळिथाची वेल पाण्याने शिंपिली माडवास गेली काय केव्हां ?
जरी हरभरा बांधाशीं लाविला गगनाला गेला काय केव्हा ?
वापीशीं लाविलें कुटज–तरूला देई तो छायेला काय केव्हा ?
नैसर्गिक तेज नाहींच बीजांत तेथें व्यर्थ यत्न का करावा ?

२४६

जेथें एक दोन धडा पाठ केला वदून गुरूला आवडीनें
संवगड्या सगें एकत्र जमलों नाचलों खेळलों आनंदानें
वाजताची घाट धावती चरण आईचें स्मरण मनीं होई
ती ही शाळा छान आनंदाचें स्थान बोले बाळपण कैसें येई ?

२४७

स्वजनीं ह्मणावें 'बाळ बुद्धिवंत हाव ही मनात हुषारीची
गुरुनें 'शाबास' ह्मणावें ही आस लागावी जीवास आवडीची
अभ्यासावाचून काळजी न कांहीं सुखाच्याच डोहीं मन पोहे
तेव्हां वहु वाटे होऊं केव्हां मोठे परी आतां वाटे सान व्हावें

२४८

जगीं जे विद्वान होवोनीया गेले शाळेचीं तीं बाळें आरंभींचीं
ज्ञानाच्या सुधेचो पहिलीच वाटी येथें त्याच्या ओठीं लागली हो !
आजही महात्मे कीर्ति ज्याची मोठी इथें त्यांनीं पाटी उजळली
धन्य शाळा–गेह, धन्य तद्विद्यार्थी ज्यानीं जगीं कीर्ती विस्तरीली

२४९

जेथें माझ्या पायीं रुतले कंटक तेथील हीं फुले देवा माझीं
जेथें माझ्यावरी उफळे शार्दूल पाडसें तेथील प्रिय माझीं
दु खाचा उन्हाळा यास देवा देवा दाखवी न केव्हा जगामाजीं
माझें जें सुकृत माझें जें संचित पडो तें निश्चित त्यांच्या काजीं!

# काव्यकिरण-माला. ३८८१

( सं० व प्र०—मि. का. भोरटके. )

अगाऊ त्रैवार्षिक वर्गणी ५॥ रु.

या मालेंतून आजवर बाहेर पडलेलें वाङ्मय काव्यरसिकास आनंद देणारें तर आहेच पण मराठी काव्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्यास तें अत्यंत उपयुक्तहि आहे. सामाजिक, ऐतिहासिक सुंदर खंडकाव्यें, चित्रकाव्यें, स्फुटकविता, रसाळ अभंग, मार्मिक निबंध, हिंदी काव्याचीं भाषांतरें अशा विविध प्रकारांनीं वरील वाङ्मयास शोभा आली असून त्यायोगानें मराठी भाषेंत महत्वाची भर पडली आहे. महाराष्ट्रीयांनीं मालेस आश्रय देऊन असें वाङ्मय संग्रहीं ठेवणें जरूर आहे. साडेपांच रुपये वर्गणींतून बारा आणे प्रवेश फी वजा जाता बाकीच्या पावणे पांच रुपयाची फेड दर तीन महिन्यांनीं एक याप्रमाणें पुस्तकरूपानें केली जाईल. पुस्तकाची किंमत चार ते आठ आणे पर्यंत असते. वर्गणीदारांस पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळते.

मालेंतून आतांपर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य ). | ८ |
| २ | भाग्याची यमुना ( ,, ) . | ६ |
| ३ | चंडीचतक ( चित्र काव्य संग्रह ). | १२ |
| ४ | कविता-वनिता (वनिता विषयक सुंदर कवितांचा संग्रह) | ८ |
| ५ | कुमुद्वती ( स्फुट कविता ) .. | ८ |
| ६ | शिवप्रताप ( भूषण कवीच्या शिवबावनीचें भाषांतर ) | ६ |
| ७ | मराठी कवि-विरुद्ध प्रो० पटवर्धन ( निबंध ) | ६ |
| ८ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) . | ७ |

हीं सर्व पुस्तकें श्री. कवि तिवारी ह्यांचीं आहेत.

**मि० का० भोरटके**

जळगांव पूर्व खानदेश.

# तिवारींचीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| *१ | काव्यकुसुमांजली ( शिल्लक नाहीं ) | ॥०१० |
| २ | काव्यरत्नमाला . . | १॥ |
| ३ | मनोहरलीला ( खंडकाव्य ) . | ॥०६ |
| *४ | प्रसन्नराधा ,, .. | ॥०६ |
| *५ | महाराणा प्रतापसिंह ,, | ॥०८ |
| ६ | मान्याची यमुना ,, .. .. | ॥०६ |
| ७ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) ... | ॥०७ |
| *८ | कविता-वनिता | ॥०८ |
| ×९ | शिवप्रताप | ॥०८ |
| ×१० | कुमुद्वती | ॥०८ |
| ११ | मराठ्यांचीं संग्रामगीतें (सचित्र आवृत्ति ४ थी) | १ |
| १२ | झांशीची संग्रामदेवता ( आवृत्ति दुसरी ) .. | ॥०८ |
| *१३ | राधामाधव | ॥०१० |
| १४ | चंडीशतक . | ॥०१२ |
| १५ | मराठी कवि विरुद्ध वा. ब. पटवर्धन बी. ए. . | ॥०६ |

पहिलीं दहा पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत. आणि ह्याच दहा पुस्तकांस महाराष्ट्रग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर या संस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

१।२।५।६।७।९।१० ह्या नंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* ह्या पुस्तकास दक्षिणाप्राइज कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत. व × ह्या पुस्तकास शिफारसपत्रें दिलीं आहेत.

हीं पुस्तकें मिळण्याचे पत्ते:—

१ दु० आ० तिवारी, जळगांव पू. खा.

२ परचुरे आणि मंडळी, माधवबाग मुंबई नं. ४

REFBK 0003981
REFBK-0003981